# दैनिक जनता आवाज

मा.ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील अभिष्टचिंतन विशेष पुरवणी

अहिल्यानगर | वर्ष 02 रे | अंक 114 | रविवार, दि. 15 जून 2025 | PRGI NO. MHMAR/25/RAA11 | पाने 12 | किंमत 4/- रुपये




महाराष्ट्राचे कणखर नेतृत्व...

जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री
मा.ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक -
शिवधन फाउंडेशन कोल्हार
अजित रमेश मोरे पाटील
अध्यक्ष

---

जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री
मा.ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

- शुभेच्छुक -
व्यापारी असोसिएशन कोल्हार भगवतीपूर

- शुभेच्छुक -
व्यापारी पतसंस्था कोल्हार बु.।

---

मा.ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक -
चौपाटी वडेवाले व कढीवडा
शिर्डी, (खंडोबा कॉम्प्लेक्स)

---

आमचे दैवत
मा.ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

- शुभेच्छुक -
दीपक (अण्णा) पटारे मित्र मंडळ
श्रीरामपूर

---

जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री
मा.ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

अनिल पांडुरंग भणगे
गव्हर्मेंट इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर, कोल्हार बु.
मा.संचालक, इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, अहिल्यानगर विभाग

विकास प्रभाकर नरोडे
मे.श्री गुरुकृपा मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्स कोल्हार
संयोजक, शिर्डी विधानसभा भारतीय जनता पार्टी केमिस्ट फार्मसिस्ट प्रकोष्ट.

---

मा.ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक : आदेश प्रतिष्ठाण गुहा (गुहा देवळाली रोड)

---

श्रीरामपूरचे भाग्यविधाते
जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री
मा.ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक -
नेवासा रोड मित्र मंडळ
श्रीरामपूर

---

जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री
मा.ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

## दाढ ग्रामपंचायत

**श्री. तात्यासाहेब गवनाथ सातपुते** (सरपंच)
**श्री. नकुल सुरेश तांबे** (उपसरपंच)

श्री. सचिन दगडू वाणी
सौ. संगीता जॉन पाळंदे
सौ. सविता आण्णासाहेब गाडेकर
सौ. अस्फिया राज इनामदार
श्री. प्रशांत सबाजीराव बनसोडे
श्री. रविंद्र छगन सातपुते
सौ. अनिता सीताराम तांबे
सौ. दिपाली केशव शिंदे
श्री. अनंता हरिदास तांबे
सौ. वनिता राजेंद्र गाडेकर
सौ. अंजली बाळासाहेब पाळंदे
सौ. वनिता संजय गाडेकर
श्री. राजेंद्र प्रल्हाद तांबे
श्री. प्रमोद भागवत बनसोडे
सौ. रोहिणी कैलास तांबे
श्री. टी . के. दिनकर (ग्रामपंचायत अधिकारी)

---

जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री
मा.ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

## पारनेर तालुका खरेदी विक्री संघ, पारनेर, ता . पारनेर

**श्री. दत्तात्रय जयराम रोकडे** (चेअरमन)
**श्री. प्रसाद भरत शितोळे** (व्हा. चेअरमन)

संचालक मंडळ

रघुनाथ माधव खिलारी
प्रमोद बबन कावरे
बाजीराम रामचंद्र अलभर
संग्राम बाळासाहेब पावडे
मधुकर हरीभाऊ पठारे
सुनिल बाळासाहेब पवार
अण्णा बबन शिंदे
शैलेंद्र संपत औटी
भाऊसाहेब महादु मेचे
सतिश राजाराम पिंपरकर
गंगाधर भानुदास रोहोकले
रेखा संजय मते (संचालिका)
ज्योती संदीप ठुबे (संचालिका)
राजेंद्र म्हस्के (सचिव)

---

जनसामान्यांच्या मनातील हक्काचे आणि लाडके व्यक्तिमत्त्व..
जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री
मा.ना.डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

- शुभेच्छुक -
श्री. अतुल के. रांका
कल्पना मेन्स वेअर
रांका कॉम्प्लेक्स, कोल्हार बु।।, ता. राहाता
मो. 99600 25344 / 7030660666

---

विकास कामांचा ध्यास लोककल्याणकारी नेतृत्व
मा. नामदार श्री. राधाकृष्णजी विखे पाटील
मंत्री महसूल, पशुसंवर्धन व दुग्धविकास
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

- शुभेच्छुक -
श्री. रवींद्र साहेबराव शिंदे
सिव्हिल इंजिनिअर अँड गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर
कोल्हार बु.।। (ता. राहाता)
7057701701

---

# शांत, संयमी विनम्र व्यक्तीमत्व

जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री
मा.नामदार
## डॉ.राधाकृष्ण विखे पाटील
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



इंजि. विनित भास्कर शिरसाठ
भगवती कन्स्ट्रक्शन - राहुरी
9657103676

विलास सिताराम लाटे
मा. उपसरपंच चिंचोली ता. राहुरी
9975792528

शुभेच्छुक -
भगवती कन्स्ट्रक्शन राहुरी

JAHAGIRDAR 7499073130




## संमिश्र

### इस्रायली हल्ल्यात १३८ इराणींचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**तेहरान/तेल अवीव :** इस्रायल आणि इराणमधील संघर्ष दुसऱ्या दिवशीही सुरू आहे. गेल्या दोन दिवसांत इराणमध्ये १३८ जणांचा मृत्यू झाला आहे. शुक्रवारी रात्री १०:३० वाजता इस्रायलने इराणच्या अणुतळांवर दुसऱ्यांदा लढाऊ विमानांनी हल्ला केला. या हल्ल्यात ६० जणांचा मृत्यू झाला. तर ३५० हून अधिक लोक जखमी झाले.

यापूर्वी शुक्रवारी सकाळी ५:३० वाजता इराणमध्ये झालेल्या हल्ल्यात ७८ जणांचा मृत्यू झाला होता. यामध्ये ९ अणुशास्त्रज्ञ आणि २० हून अधिक इराणी कमांडर होते.

### विमान अपघात १७० शवपेट्या तयार करण्याचे आदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहमदाबाद :** अहमदाबाद विमान अपघातातील मृतांची संख्या २७५ वर पोहोचली आहे. मृतदेह ठेवण्यासाठी १७० शवपेट्या मागवण्यात आल्या होत्या. वडोदरा येथील एका व्यक्तीने सांगितले की, एअर इंडियाच्या व्यवस्थापकांनी फोन करून शवपेट्या मागवल्या. दरम्यान, अहमदाबाद सिव्हिल हॉस्पिटलचे डिप्टी सिविल सुपरिंटेंडंट रजनीश पटेल यांनी शनिवारी सांगितले - आतापर्यंत २४८ मृतदेहांचे डीएनए नमुने क्रॉस व्हेरिफाय केले गेले आहेत, त्यापैकी ११ मृतदेहांचे डीएनए जुळले आहेत. पटेल म्हणाले की, आज एका महिलेचा मृतदेह तिच्या कुटुंबियांना सोपवण्यात आला. शुक्रवारी ८ मृतदेह त्यांच्या नातेवाईकांना सोपवण्यात आले. एकूण ९ मृतदेह सोपवण्यात आले आहेत. ८ जखमींवर उपचार सुरू आहेत, तर एकाची प्रकृती गंभीर आहे.

### शेतकरी कर्जमाफीचा विषय जाहिरनाम्यात नव्हता:अतुल सावे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**हिंगोली :** शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावरून राज्यात रान पेटले असताना भाजप नेते तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांनी आपल्या पक्षाच्या जाहिरनाम्यात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा कोणताही विषय नव्हता असा दावा केला आहे. त्यांचा हा दावा भाजपसाठी अडचणीचा ठरण्याची चिन्हे आहेत. अतुल सावे शनिवारी हिंगोलीच्या दौऱ्यावर होते. तेथील शासकीय विश्रामगृहात मोदी सरकारची यशस्वी ११ वर्षे या मुद्यावर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी उपरोक्त दावा केला. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष गजानन घुगे, आमदार तान्हाजी मुटकुळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, फुलाजी शिंदे, शिवा घुगे, उमेश नागरे आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.




# मंत्री विखेंच्या वाढदिवसानिमित्त 'रक्तदान'

## प्रवरामध्ये डॉ. सुजय विखे पाटील, शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुस्मिता विखेंनी केले उद्‌घाटन

### २५० रक्तदात्यांनी केले रक्तदान; ३५० व्यक्तींची केली मोफत आरोग्य तपासणी

जनता आवाज वृत्तसेवा

**लोणी : जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था आणि पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान दिनाचे औचित्य साधून, आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबीरात २५० रक्तदात्यांनी रक्तदान करुन, सामाजिक बांधिलकीचा वसा जोपासला.**



अहमदबाद येथे विमान अपघाताच्या घडलेल्या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर मंत्री विखे पाटील यांनी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय जाहीर करुन, कोणतेही सार्वजनिक आणि सत्कार सोहळे आयोजित न करता सामाजिक उपक्रम राबवावेत, असे आवाहन केले होते. त्यानुसार प्रवरा परिवरातील संस्थानी एकत्रित येवून रक्तदान दिनाच्या दिवशी भव्य रक्तदान शिबीर कन्या विद्या मंदिर येथे आयोजित केले होते.

या रक्तदान शिबीराचे औपचारिक उद्घाटन डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या रक्तदान शिबीरामध्ये २५० रक्तदात्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवून सामाजिक दायित्व जोपासले आहे. या बरोबरीनेच ३५० व्यक्तींची आरोग्य तपासणी करण्यात आली.

याप्रसंगी संस्थेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, शिक्षण संचालिका लिलावती सरोदे, डॉ. किरण आहेर उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वृक्ष संवर्धनाच्या चळवळीला पुढे घेवून जाण्यासाठी 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम राबविण्याच्या केलेल्या आवाहनाला पाठबळ म्हणून मंत्री विखे पाटील यांनी सर्व गावे, वाड्या वस्त्यांमध्ये हा उपक्रम राबविण्याचे सुचित केले होते.

लोणी बुद्रूक गावामध्ये उपक्रमाचा प्रारंभ मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला. माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सर्व शाखांमध्ये एक पेड माँ के नाम उपक्रम राबविण्यात आला.

प्रारंभी मंत्री विखे पाटील यांनी लोणी बुद्रूक गावचे ग्रामदैवत श्री. म्हसोबा महराजा यांना महाअभिषेक करुन दर्शन घेतले. ग्रामस्थांच्या सहयोगातून श्री. म्हसोबा महाराजांना तयार करण्यात आलेले सुवर्ण अलंकारही अर्पण करण्यात आले आहे.

**गरजूंना मदत करा : ना. विखे पाटील**

अहमदाबाद येथील घटनेच्या पार्श्वभूमीवर वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय आपण घेतला आहे. कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी कोणतेही कार्यक्रम आयोजित न करता समाजातील निराधार, गरजू, एकल महिला आणि शालेय विद्यार्थ्यांना मदत करण्याचे आवाहन आपण केले असल्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

> जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या आवाहनाला पाठबळ म्हणून रक्तदान शिबीर, वृक्षारोपण आणि आरोग्य शिबीराचे आयोजन संस्था पातळीवर करण्यात आले होते.
>
> **- डॉ. सुस्मिता विखे पाटील**

## साखर उद्योग अभ्यासासाठी नागवडे ब्राझीलला जाणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे हे दि. १५ ते २३ जून या कालावधीत राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्ली यांनी आयोजित केलेल्या ब्राझील अभ्यास दौऱ्यात सहभागी होत आहेत. त्यानिमित्त कारखाना कार्यस्थळावर संचालक मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करून ब्राझील दौऱ्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



> स्व. शिवाजीराव नागवडे यांच्या विचार प्रेरणेतून नागवडे कारखान्याच्या माध्यमातून ऊस उत्पादक सभासद-शेतकऱ्यांना योग्य न्याय देण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला आहे. ब्राझील अभ्यास दौऱ्यामुळे ऊस शेती व साखर धंदा यांचा अधिक अभ्यास करण्याची संधी मिळणार असून त्याचा फायदा भविष्यात होणार आहे.
>
> **- राजेंद्र नागवडे, चेअरमन**

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्ली यांनी महासंघाचे अध्यक्ष व माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या नेतृत्वाखाली ब्राझील देशातील साखर उद्योगाचा अभ्यास करण्यासाठी अभ्यास दौऱ्याचे आयोजन केलेले आहे. सदर दौऱ्यामध्ये नागवडे कारखान्याचे चेअरमन नागवडे यांच्यासह हरियाणाचे सहकार मंत्री अरविंद कुमार शर्मा, राज्याचे माजी मंत्री राजेश टोपे, आ. विश्वजीत कदम, राहुल आवाडे, कल्याणराव काळे, प्रमोद जाधव, अभिजीत पाटील, फ‍ेडरेशनचे कार्यकारी संचालक प्रकाश नाईक नवरे, हरियाणाचे कॅप्टन शक्ती सिंग यांच्यासह देशातील काही नामवंत साखर कारखान्याचे प्रतिनिधी सहभागी होत आहेत.



लोणी : जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी लोणी बुद्रूक गावचे ग्रामदैवत श्री. म्हसोबा महाराज यांना महाअभिषेक करुन दर्शन घेतले. याप्रसंगी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, डॉ. सुजयदादा विखे पाटील, धनश्रीताई विखे पाटील, हभप उध्दव महाराज मंडलिक व ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामस्थांच्या सहयोगातून श्री. म्हसोबा महाराजांना तयार करण्यात आलेले सुवर्ण अलंकारही अर्पण करण्यात आले आहे.

## आ. काळेंच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांसाठी चर्चा सत्र

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या सभासद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी कारखान्याचे मार्गदर्शक व ज्येष्ठ संचालक मा. आ.अशोकराव काळे व कारखान्याचे चेअरमन आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना कार्यक्षेत्रातील कोपरगाव तालुक्यातील वडगाव-बक्तरपूर येथे आडसाली ऊस पिक व कीड नियंत्रणा बाबत परिसंवाद व चर्चा सत्र उत्साहात संपन्न झाले. अध्यक्षपदी कारखान्याचे व्हा.चेअरमन शंकरराव चव्हाण होते.

कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या दैनंदिन गाळप क्षमतेत वाढ झाल्यामुळे ऊस उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने कारखाना संचालक मंडळाने कारखाना कार्यक्षेत्राच्या प्रत्येक गटात ऊस मेळावे व चर्चा सत्र घेण्याचे वार्षिक नियोजन केले आहे. त्यानुसार वडगाव बक्तरपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या



आडसाली ऊस पिक व कीड नियंत्रणा बाबत परिसंवाद व चर्चा सत्रात वसंतदादा शुगर इंस्टीट्युटचे ऊस उत्पादन व संरक्षक विभागाचे प्रमुख संशोधक डॉ. अशोक कडलग व रोग शास्त्र विभागाचे प्रमुख संशोधक डॉ. गणेश कोटगिरे यांनी उपस्थित ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. अशोक कडलग यांनी ऊस पिकाच्या पाणी व खत व्यवस्थापनाबद्दल माहिती देतांना सांगितले की, ऊस पिकाची लागवड करतांना शेतकऱ्यांनी योग्य जमिनीची निवड करून सेंद्रिय कर्ब वाढवावे.खतांचा संतुलित वापर करावा.क्षारयुक्त जमिनीची सुधारणा करून पाण्याचा कमीत कमी वापर करून जास्तीत जास्त ऊस उत्पादन घ्यावे. त्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात ए.आय चे देखील मार्गदर्शन घ्यावे असा सल्ला दिला. सूत्रसंचालन आण्णासाहेब चीने यांनी केले तर आभार शेतकी अधिकारी निळकंठ शिंदे यांनी मानले.

> चालू वर्षी मे महिन्यापासूनच वरून राजाने कृपा केली असून कारखाना कार्यक्षेत्रात देखील चांगल्या प्रकारचे पर्जन्यमान होत आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आडसाली ऊसाचे उत्पन्न घ्यावे. आडसाली ऊसाच्या लागवडीतून एकरी ६० ते ७० टन उत्पन्न मिळते व आडसाली ऊस कारखान्याचा गळीत हंगाम सुरु होताच तोडला जातो. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आडसाली ऊसाच्या लागवडी कराव्यात.
>
> **- सुनील कोल्हे**

## राष्ट्रवादीच्या आमदारांना सत्तेचे वेध : गिरीश महाजन

**जनता आवाज वृत्तसेवा**



**मुंबई:**शिवसेनेनंतरराष्ट्रवादीमध्येदेखीलमोठी फूट पडली होती. अजित पवार महायुतीला पाठिंबा देत सत्तेत सहभागी झाले, तर दुसरीकडे शरद पवार यांनी मात्र महाविकास आघाडीसोबत राहण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रवादीमध्ये फूट पडल्यानंतर पक्षातील अनेक ज्येष्ठ नेत्यांनी शरद पवार यांची साथ सोडत अजित पवार यांना पाठिंबा दिला.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार राष्ट्रवादी शरद पवार गटातील आमदार मतदारसंघातील कामे होत नसल्यानं अस्वस्थ आहेत. आपणही सत्तेत जायला हवं असा सूर या आमदारांचा आहे. यावर आता भाजपचे मंत्री आणि नेते गिरीश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

आमदारांनी काय मागणी केली हे माझ्या काही कानावर नाही, त्यामुळे मला काही माहिती नाही. मात्र इतर पक्षातील अनेक लोकांना आपलं भविष्य हे अंधकारमय वाटत आहे.

# शिंगणापुरात सकल हिंदू समाज एकवटला

## हिंदू समाजाचा धर्म रक्षणासाठी विराट मोर्चा; आ. जगताप, बेग, शेटेंने केले मार्गदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** सकल हिंदू समाजाच्या वतीने शिंगणापूर देवस्थान व मुस्लिम समाजाच्या कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढून टाकण्यासाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हिंदू समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> शनिशिंगणापूर विश्वस्त मंडळाने आताच काढलेल्या हिंदू कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्यात यावे. लोकसभेत वक्फ बोर्डच्या समर्थनार्थ मतदान केलेल्या खासदारावर गाव बंदी घाला.
>
> **- सागर बेग**



आचार्य तुषार भोसले यांनी शनैश्वर देवस्थान हे जगभरातल्या हिंदूंचे व शनी भक्तांचे आराध्य स्थान असल्याचे सांगत येथे अन्य धर्मियांचे लाड सहन करणार नसल्याचे सांगितले. हिंदूंच्या ताकदीमुळे आज मुस्लिम कर्मचारी घरी गेले असल्याचे सांगत महाराष्ट्रातील कुठल्याही देवस्थान मध्ये हिंदू व्यतिरिक्ततांचे केलेले लाड हिंदू खपवून घेणार नसल्याचे सांगितले. महाराष्ट्रातील मंदिरात असा प्रयत्न झाल्यास सकल हिंदू एकत्र येणार असल्याचेही सांगितले. या मोर्चासाठी आ. विठ्ठलराव लंघे, भाजप नेते ऋषिकेश शेटे, सचिन देसरडा, माजी आ. बाळासाहेब मुरकुटे यांच्यासह हजारो समाज बांधव उपस्थित होते.

मागील महिन्यात मुस्लिम व्यक्तीने चौथरा सुशोभीकरणाचे काम चौथरा करत असल्याचे निदर्शनात आल्याने भारतीय जनता पक्षाचे ऋषिकेश शेटे यांनी हे काम त्वरित थांबवले होते. या घटनेनंतर देवस्थान मध्ये असलेले मुस्लिम कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्यासाठी दि. १४ रोजी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. शनैश्वर देवस्थानच्या विश्वस्तांच्या बैठकीत नियमितपणे कामावर नसलेल्या व कामात काम चुकारपणा करणाऱ्या १६७ कर्मचाऱ्यांवर देवस्थाने कारवाई करत त्यांना कामावरून काढून टाकले यात ११४ मुस्लिम कर्मचाऱ्यांचा ही समावेश होता. यावेळी शनिशिंगणापूरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके व सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

> हा कार्यक्रम राजकीय नसून येथे येणारे सर्व हिंदू म्हणून आलेले आहेत. इथून पुढे सर्वांनी सर्व ठिकाणी बारकाईने लक्ष ठेवण्याची गरज आहे. देवस्थान जिवंत राहण्यासाठी सर्वांनी जागरूक राहण्याची गरज आहे. परिसरात मुस्लिमांना कामावर ठेवू नका. देवस्थानमधील सध्या वादग्रस्त ठरलेले बनावट ॲप संदर्भात कारवाई होण्याची गरज आहे.
>
> **- संग्राम जगताप, आमदार**



# ना. विखेंचे 'शिक्षण व्हिजन' ग्रामीण विकास साध्य करणारे

**राजकारण नव्हे तर समाजकारण हा उदात्त हेतू जपत राज्याचे जलसंपदा तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील हे समाजकार्यात कार्यरत करत आहे. एक कुटुंब वत्सल्य नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते. प्रवरा हे माझे कुटुंब आहे यासाठी अहोरात्र परिश्रम घेत असलेले राज्याचे हे आगळ आणि वेगळे असं व्यक्तिमत्व सर्वसामान्यांसाठी नामदार आणि कुटुंबासाठी आबा... आज आबांचा ६६ वा वाढदिवस त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा हा अल्पसा परिचय...**



पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांचे विचार आणि आचार त्याचबरोबर संस्कार ते पुढे नेत असताना या संस्काराची शिदोरी युवा पिढीने ही जपली पाहिजे यासाठी लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील युवकांना आदर्श शिक्षणा सोबत संस्कार आणि कौशल्य प्रदान करण्याचे काम मंत्री ना. विखे पाटील करत आहेत. ऊस उत्पादक, सामान्य जनता,गोरगरीब आणि साखर कामगाराचा मुलगा हा डॉक्टर इंजिनियर झाला पाहिजे तो शहरात जाऊन शिक्षणाच्या माध्यमातून पुढे गेला पाहिजे ही तळमळ स्वर्गीय पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांची होती तीच तळमळ लोकनेते पद्मभूषण ड. बाळासाहेब विखे पाटील यांनी पुढे नेली आणि आज हेच काम जलसंपदा तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील हे अधिक सक्षमपणे करत आहेत हे करत असताना संस्थेच्या माध्यमातून अनेक उपक्रम त्यांनी सुरू केले. तळागाळातील मुलांना शिक्षण हे हाकेच्या अंतरावर मिळावे यासाठी आज आदर्श अशी शिक्षण व्यवस्था त्यांनी निर्माण केली राहाता तालुक्यात आणि विशेषता:प्रवरा परिसरात प्रत्येक तीन किलोमीटर वर माध्यमिक विद्यालय पाच किलोमीटर वर कनिष्ठ महाविद्यालय आणि दहा किलोमीटर वर वरिष्ठ महाविद्यालय सोबत तांत्रिक शिक्षण मिळावे यासाठी इंजिनिअरिंग पॉलीटेक्निक, आयटीआय, कृषी शिक्षण त्यांनी संस्थेच्या माध्यमातून सुरू केले आज प्रवरेत ४० हजाराहून अधिक विद्यार्थी हे विविध प्रकारचे शिक्षण घेत आहेत शिक्षणासोबतच आरोग्य आणि आरोग्य शिक्षण यातही मंत्री विखे पाटील यांनी मोठे कार्य केले आहे. शिक्षण हा सर्वांचा अधिकार आहे शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि हे दूध जो प्राशन करेल तो पुढे गेल्याशिवाय राहणार नाही हाच हेतू डोळ्यासमोर ठेवून मंत्री विखे पाटील यांनी प्रवरेच्या माध्यमातून पारंपारिक शिक्षणासोबतच कौशल्य आधारित शिक्षणावरती विशेष लक्ष केंद्रित केले. चाणक्य कौशल्य आधारित व्यावसायिक शिक्षणाच्या माध्यमातून राज्य सरकारला एक आदर्श मॉडेल प्रवरेच्या माध्यमातून मंत्री विखे पाटील यांनी दिले. प्रवरेच्या कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांनी आणि विशेषता कुटुंब सांभाळणाऱ्या महिला आज सक्षम होत आहेत. कौशल्य शिक्षणाच्या माध्यमातून अपूर्ण राहिलेले शिक्षण आज अनेक महिलांनी सुरू करत आपला सक्षम असा रोजगार त्यांनी निवडला आहे.

ग्रामीण विद्यार्थी हा कष्टाळू आहे आणि तो पुढे जाऊ शकतो यासाठी गरज आहे ती त्याला योग्य मार्गदर्शन करण्याची आणि यासाठी मंत्री विखे पाटील यांनी प्रवरा स्पर्धा परीक्षा केंद्र आणि पोलीस आर्मी प्रशिक्षण केंद्र सुरू राहाता,शिर्डी,आश्वी,साञळ,कोल्हार आणि लोणी या ठिकणी सुरु केली. या माध्यमातून आज ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी शासकीय, निमशासकीय, पोलीस आणि आर्मी भरती मध्ये सहभागी होऊन यशही त्यांनी संपादन केले हे करत असतांना हे विद्यार्थी या स्पर्धा केंद्रामध्ये पोलीस आर्मी भरती मध्ये सहभागी व्हावे ह्या उद्देशाने त्यांना अनेक सेवा सुविधा देखील त्यांनी दिल्या आज हजारो विद्यार्थी हे शासकीय निमशासकीय आणि पोलीस आर्मी भरती मध्ये सहभागी झाले.

प्रवरेचा विद्यार्थी हा जागतिक पातळीवरती कार्यरत आहे. अनेक विद्यार्थ्यांनी आज जगाच्या पाठीवरती प्रवरेचं नांव उज्वल केले आहे. हे करत असताना केवळ प्रवरा हे माझे कुटुंब आहे आणि त्या कुटुंबाचा मी प्रमुख आहे आणि कुटुंब प्रमुख म्हणून माझ्या कुटुंबातील प्रत्येक युवक युवती ही सक्षम झाली पाहिजे शहराचा पैसा हा ग्रामीण भागात आला पाहिजे यासाठी सदैव मंत्री विखे पाटील हे संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम हे राबवत आहेत हे उपक्रम राबवत असताना त्यांना पाठबळ... प्रोत्साहन... पंखात बळ मिळावे म्हणून प्रसंगी स्वतःचा पैसाही ते खर्च करतात संकट काळात जो आपल्या पाठीशी भक्कमपणे उभे राहतो तोच खरा नेता असतो आणि म्हणूनच मंत्री विखे पाटील यांनी कोविड काळात आरोग्य सेवेबरोबरच पैशा अभावी शिक्षण थांबू नये यासाठी राज्यात नव्हे तर देश पातळीवरती संस्थेच्या माध्यमातून कोविड काळात ऑनलाइन शिक्षण पद्धती सुरू करत असताना यासाठी विशेष अशी यंत्रणा ही त्यांनी उभे केले शिक्षणातून माणूस पुढे जाऊ शकतो. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून त्यांनी कोविड काळात संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष शिष्यवृत्ती दिली. आज चार वर्षांनंतर प्रवरेतील इंजिनिअरिंग, पॉलीटेक्निक आयटीआय कृषी संलग्रित महाविद्यालय आणि अतांत्रिक क्षेत्रातील विद्यार्थी हे नोकरीसाठी सज्ज झाले आहेत.

ग्रामीण भागातील विद्यार्थी हा पुढे जावा यासाठी ते सदैव प्रयत्नशील असतात. भारत हा युवकांचा देश आहे सगळ्यात तरुण देश आहे येथील युवकांना योग्य दिशा जर दिली तर भारत हा आत्मनिर्भर होईल हे देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे आवर्जून सांगतात आणि हेच काम प्रवरेत सध्या सुरू आहे प्रवरेमध्ये वेगवेगळ्या करिअर संधी उपलब्ध करून देत असतानाच प्रवरेचा विद्यार्थी हा स्वतःचे स्टार्ट अॅप सुरू करून पुढे जावा यासाठी प्रवरा रुरल इंजिनिअरिंग कॉलेज या ठिकाणी स्टर्ट अॅप उभारणीसाठी मार्गदर्शन करण्यासाठी त्यांनी प्रिझम सुरू केले आहे. या माध्यमातून विद्यार्थी, शेतकरी महिला बचत गट आणि ग्रामीण व्यावसायिकांना माहीती उपलब्ध होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी हा उत्कृष्ट असा व्यावसायिक असतो त्याच्याकडे बिजनेस कौशल्य असतात त्याच्या कलागुणांना संधी द्यावी यासाठी मंत्री विखे पाटील यांच्या संकल्पनेतून बिल्डिंग प्रवारा हा उपक्रम शिक्षण क्षेत्राच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असाच ठरला अवघ्या पाच दिवसात ग्रामीण भागातील विद्यार्थी विविध व्यवसायाच्या माध्यमातून एक कोटीहून अधिक रुपयाची कमाई करू शकतो हे मंत्री विखे पाटील यांच्या कल्पक बुद्धीमुळे मिळालेल्या संधीतून प्रवरेच्या विद्यार्थ्यांनी दाखवून दिले. प्रवरेच्या माध्यमातून दरवर्षी साजरा होणारा एक गाव एक गणपती अंतर्गत प्रवरा सांस्कृतिक क्रीडा महोत्सव हा सर्वांसाठी सांस्कृतिक परंपरेची मेजवानीच ठरत आहे. सहकारातून परिवर्तन होते यासाठी सहकार हा पुढे नेण्याचे काम हे लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी कायमच केले यासाठी पद्मभूषण डा॑. बाळासाहेब विखे पाटील यांनी संघर्षही केला आणि हेच काम आज मंत्री विखे पाटील हे करत आहेत युवा पिढीला आणि प्रवरेत शिक्षण घेणाऱ्या युवकांना सहकारातून समृद्धीकडे शिक्षणातून विकासाकडे हे घोषवाक्य घेऊन अनेक उपक्रम मंत्री विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवरा शैक्षणिक संकुलामध्ये सुरू आहे. या माध्यमातून सहकार टिकला पाहिजे सहकार वाढला पाहिजे सहकारातून प्रत्येकाचा विकास होतो ही मूळ संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम हे सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून अतिशय चांगल्या प्रकारे झाले आहे. गणपती बाप्पांची मिरवणूक डीजे मुक्त करत पारंपारिक वाद्यासह पारंपारिक वेशभूषा, लाठी-काठी, टाळ मृदुंगाचा गजर विठू माऊलीची पावली, लेझीम ढोल ताशा माध्यमातून डीजे मुक्त गणपती बाप्पा विसर्जन मिरवणूक ही विश्वविक्रम करणारी ठरली.

आज नोकरीला मर्यादा आहे आणि ह्याच मर्यादा ओळखून प्रवरेचा विद्यार्थी हा नोकरी करणारा नव्हे तर नोकरीत देणारा व्हावा यासाठी विशेष प्रयत्न मंत्री विखे पाटील यांच्या माध्यमातून प्रवरेने सुरू केले आहेत. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विविध कौशल्य व्यावसायिक ज्ञान शेतीपूरक व्यवसाय त्याचबरोबर पारंपारिक व्यवसायाला नव्या तंत्रज्ञानाची जोड देत प्रवरेत माध्यमातून कौशल्य आधारित शिक्षणातून आत्मनिर्भर विद्यार्थी घडविण्यासाठी विशेष प्रयत्न हे सुरू आहेत.



आज साहेबांचा ...आबांचा वाढदिवस.. त्यांच्याविषयी लिहीत असताना खरंतर शब्दही अपुरे पडतात कारण आभाळाएवढं काम आणि आभाळाएवढं प्रेम करणारे नेतृत्व हे केवळ मंत्री विखे पाटील असंच म्हणावं लागेल. सलग आठ वेळा शिर्डी मतदार संघाचे नेतृत्व करताना सबका मालिक एक है ही साईंची शिकवण त्यांनी मतदार संघामध्ये प्रकर्षाने राबवली. सबका साथ सबका विकास या भावनेतून मंत्री विखे पाटील हे काम करत आहे खरंतर विरोधकांनाही हेवा वाटावा असंच काम मंत्री विखे पाटील यांनी या मतदारसंघांमध्ये केले आहे. निळवंडे धरणाचे पाणी हे खऱ्या अर्थाने लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांची स्वप्नपूर्ती ठरले निळवंड्यावर राजकारण हे प्रत्येक निवडणुकीमध्ये कायमच तापत असे हा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागावा यासाठी मंत्री विखे पाटील यांनी पुढाकार घेतला. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या शुभहस्ते निळवंडे चे पाणी जिरायत भागाला ४० वर्षाच्या प्रतीक्षेनंतर आले. सर्वसामान्य जनतेमध्ये कायम रमणारे.. सामान्य जनतेचे नेतृत्व... प्रवरेचे कुटुंब प्रमुख.. आणि कुटुंबाचे आबा आणि सर्वसामान्यांचे कायमच नामदार असणाऱ्या डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना यांना वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा...

**-डॉ. सुस्मिता राधाकृष्ण शालिनीताई विखे पाटील**
मुख्य कार्यकारी अधिकारी, लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था, लोणी






**विनम्र आम्ही, कृतज्ञ आम्ही...!**

आपले दिशादर्शक नेतृत्व
आणि मार्गदर्शन,
हीच आमची **उर्जा**
आणि **सामर्थ्य** आहे.

आमचे नेते
मा.नामदार डॉ.
**राधाकृष्णजी विखे पाटील**
जलसंपदामंत्री महाराष्ट्र राज्य तथा
पालकमंत्री अहिल्यानगर जिल्हा

यांना **वाढदिवसाच्या**
हार्दिक **शुभेच्छा!**



**श्री. ज्ञानेश्वर रघुनाथ पा. खर्डे**
**संचालक**, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील
सहकारी साखर कारखाना लि., प्रवरानगर
**मा. उपसरपंच**, कोल्हार बु।। ग्रामपंचायत
**अध्यक्ष**, कृषक शेतकरी गट, कोल्हार बु।।

शुभेच्छुक

**कृषक शेतकरी गट**
एकच ध्येय शेतकरी समृद्ध
अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सर्व सभासद

**साई समर्थ उद्योग समुह**
कोल्हार बुद्रुक



जलसंपदा मंत्री तथा
अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री
मा.ना.डॉ.
राधाकृष्ण
विखे पाटील
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
अनेक प्रश्न
उत्तर फक्त
विखेपाटील
राधाकृष्ण
रजि. नं. ए.एन.आर.बी.एन.के. १४५ रजि.दि. १६/६/१९७५
प्रवरा रूरल एज्युकेशन सोसायटी
सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित
लोणी बु.॥, ता. राहाता, जि. अहमदनगर पिन - ४१३७३६ फोन (०२४२२) २९९३४५




साडेतीन शक्तीपिठ
आदिशक्ती श्री भगवतीदेवी
जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री
मा. नामदार साहेब
श्री.डॉ.राधाकृष्ण विखे पाटील
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
कोल्हार भगवतीपूर देवालय ट्रस्ट
श्रीक्षेत्र कोल्हार भगवतीपूर, ता. राहाता, जि. अहिल्यानगर. मो. ९५२९३७७९५३
kolharbhagawatipurdevalaya@gmail.com
www.bhagwatimata.in
✻ अध्यक्ष ✻
श्री. सयाजी उर्फ भाऊसाहेब रघुनाथ खर्डे पा.
✻ उपाध्यक्ष ✻
श्री. साहेबराव सखाराम दळे पा.
✻ खजिनदार ✻
डॉ. श्री. भास्करराव निवृत्ती खर्डे पा.
✻ सरचिटणीस ✻
श्री. संपत विठ्ठलराव कापसे पा.
• विश्वस्त मंडळ •
सौ. शितल सुरेंद्र खर्डे पा.
श्री. चंद्रभान आप्पासाहेब खर्डे पा.
श्री. संभाजी रघुनाथ देवकर पा.
श्री. नानासाहेब दगडू कडसकर पा.
श्री. लक्ष्मण बाळासाहेब खर्डे पा.
श्री. सर्जेराव सोन्याबापू खर्डे पा.
श्री. विजय माधवराव निबे पा.
श्री. जनार्दन सर्जेराव खर्डे पा.
श्री. वसंत नानासाहेब खर्डे पा.
श्री. अजित रमेश मोरे पा.
श्री. सुजित लक्ष्मण राऊत पा.
सर्व कर्मचारी वृंद
लक्ष्मी अक्षर, कोल्हार
10268537@cbin
80G नुसार
देणगीदारांना
आयकरात सवलत
तिर्थक्षेत्र विकास
'ब' वर्ग
भक्तनिवास हॉल
व रूम उपलब्ध




जलसंपदा मंत्री तथा
अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री
मा.ना.डॉ.
राधाकृष्ण
विखे पाटील यांना
वाढदिवसाच्या
हार्दिकशुभेच्छा!
मा. श्री सुधीर रायभान
आहेर पाटील
संचालक, प्रवरा सहकारी बँक
संस्थापक अध्यक्ष, संपदा फौंडेशन कोल्हार
मा. श्री विजय उत्तमराव
कडू पाटील.
संचालक, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील
सहकारी साखर कारखाना, प्रवरानगर.
वास्तू विशारद
मा. श्री योगेश अशोकराव
आहेर पाटील ( बंटी )
उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते
मा. श्री सचिन बबनराव
आहेर पाटील.
उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते
मा श्री राहुल निवृत्ती
घोगरे पाटील
सामाजिक कार्यकर्ते..
JAHAGIRDAR 7499073130




# महिला सक्षम होणे काळाची गरज : हेरंब कुलकर्णी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** एखाद्या कुटुंबातील महिला जर कमावती असेल व तिला आर्थिक स्वातंत्र्य मिळाले तर त्या कुटुंबाची होरपळ होत नसल्याने महिला आर्थिक सक्षम होणे ही काळाची गरज असल्याचे मत एकल महिला समितीचे प्रमुख हेरंब कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

हिरकणी लोकसंचलीत साधन केंद्र व पाथर्डी तालुका एकल महीला समितीच्या वतीने आयोजित महीला मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी किसन आव्हाड, पोपट फुंदे, भारती असलकर, राजेंद्र सावंत, सुनील पाखरे, हिरा माळवे उपस्थित होते. कुलकर्णी म्हणाले, कोरोना काळात नवब्द हजार पुरुष मयत झाले. नव्वद हजार महीला विधवा झाल्या. सरकारने एकल महीलांचे सर्वेक्षण करण्याची गरज आहे. आम्ही सध्या ऐंशी तालुक्यात काम करीत अहोत. महीलांना रोजगार निर्मीती करण्यासाठी काम सुरु आहे. बाल संगोपण



> एकल महिलांचे प्रश्न दिवसागणिक वाढत आहेत अशा महिलांना मानसिक भावनिक सामाजिक आधार देण्यासाठी सुद्धा शासनाकडून विविध पातळ्यांवर उपाययोजनांची आवश्यकता आहे. स्त्रियांच्या हतबलतेतून व असुरक्षिततेमुळे सामाजिक गुन्हेगारी वाढते या गुन्हेगारीचे थेट परिणाम कुटुंब व्यवस्थेवर होतात यासाठी उत्पन्नाचे शाश्वत स्त्रोत व सामाजिक अधिकाराची भक्कम साथ अशा महिलांमागे उभी राहिल्यास समाजाची सुद्धा निकोप व सुरक्षित वाढ निश्चित होईल.
>
> **– हेरंब कुलकर्णी**

योजनेतुन एकलाख दहा हजार मुलांना आर्थिक लाभ मिळत आहे. संजय गांधी निराधान योजनेतुन महीलांना आर्थिक मदत केली जाते. पाथर्डी तालुक्यात तेरा हजार एकल महीला आहेत. त्यांच्या मुलांची शिक्षणाची जबाबदारी घेणारे अनेक दाते आहेत.

त्यासाठी तालुका पातळीवर समिती गठीत करुन मुलांचा शिक्षणासाठी खर्च करणाऱ्यांना दात्यांमधे व मुलांमधे समन्वय साधण्याचे काम ही समिती तालुक्यात करील. सरकारी योजना बरोबरच महीलांना स्वतःचा रोजगार उभा करण्यासाठी आम्ही थेट मदतीचा हात देणार अहोत. कौटुंबिक अर्थशास्त्र स्त्रियांच्या हाती अधिक सुरक्षित राहते.

# काटेकोर शेती पद्धतीतून नफा मिळविणे शक्य

## डॉ. उत्तमराव कदम; कोल्हेवाडी येथे मंत्री विखे पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त शेतकरी चर्चासत्र

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** सध्या बदलत्या हवामानामुळे व इतर बाबींमुळे शेती व्यवसायात मोठे आव्हान निर्माण झाले असून हे आव्हान कमी करण्यास काटेकोर शेती पद्धतची मदत होणार असून या पद्धतीमुळे कमी जागेत, कमी पाण्यात व कमी खर्चात दर्जेदार कृषी उत्पादन मिळते. त्यामुळे शेती व्यवसायात नफा मिळवू शकेल असे प्रतिपादन प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांनी केले आहे.



लोकनेते पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ६६ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून व संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्थेने कोल्हेवाडी येथे आयोजित केलेल्या शेतकरी चर्चासत्रात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या संचालिका अलका दिघे होत्या. यावेळी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. दिलीप महाले, सरपंच सुवर्णा दिघे, उपसरपंच जालिंदर दिघे, माजी उपसरपंच मोहन वामन, जनसेवा मंडळ अध्यक्ष अमोल दिघे, राजेंद्र दिघे, इंद्रभान दिघे, कल्याणी कोल्हे, आकाश वाळुंज, सतीश वाळुंज आदी ग्रामस्थ उपस्थित होते. प्रा. सुदाम बर्पे यांनी भाजीपाला पिकांमधील विविध कीड व रोग तसेच त्यांचे नियंत्रण याविषयी उपस्थित शेतकऱ्यांना माहिती दिली. सहायक कृषी अधिकारी श्रीमती अर्चना नवले यांनी कृषी विभागाच्या शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध योजनांविषयी मार्गदर्शन केले. सुरवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रमेश जाधव यांनी केले. सदर चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी कृषी महाविद्यालयाचे डॉ. विक्रम अनाप, प्रा. अक्षया वाळुंज तसेच कृषीदुत इंद्रजीत दिघे, सार्थक दिघे, कार्तिक म्हसे, प्रतीक गोसावी व सौरभ पगार आदींनी प्रयत्न केले.

# बाबासाहेब लोंढे यांचे निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शिक्षक भारती संघटनेचे नेते आणि राष्ट्रीय पाठशाळा हायस्कूलचे आदर्श शिक्षक बाबासाहेब लोंढे (वय ५३) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# सावकाराच्या धमकीला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

## मृत्यूपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत उघड केला धक्कादायक प्रकार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** तालुक्यातील धायतडकवाडी येथील



गरडवस्तीवरील रहीवाशी बाबासाहेब नामदेव धायतडक (वय ४६) या शेतकऱ्याने सावकाराच्या मानसिक छळाला कंटाळून आत्महत्या केली.

आत्महत्येपूर्वी मयत बाबासाहेब धायतडक यांनी लिहिलेल्या चिठ्ठीत बाळासाहेब बबन गर्जे (रा. अकोला, ता. पाथर्डी) याने वेळोवेळी दमदाटी व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्याचे नमूद केले आहे.

फिर्यादी सचिन बाबासाहेब धायतडक यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या वडिलांनी एक वर्षांपूर्वी म्हशी घेण्यासाठी बाळासाहेब बबन गर्जे याच्याकडून १० टक्के व्याज दराने ६ लाख रुपये घेतले होते. त्यापैकी ५ लाख रुपये त्यांनी व्याजा सह परत केले होते. मात्र तरीही बाळासाहेब बबन गर्जे यांनी आणखी ५ लाख रुपयांची अवास्तव मागणी करत सातत्याने धमकी देण्यास सुरुवात केली.

११ जून रोजी गर्जे यांनी सार्वजनिकरित्या वडिलांना अपमानित करत शिवीगाळ केली व 'पैसे दे नाहीतर तुझी जमीन माझ्या नावावर कर' अशी धमकी दिली. दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवार दि. १२ जून २०२५ रोजी सकाळी बाळासाहेब बबन गर्जे याचा पुन्हा फोन आला आणि पाथर्डी येथील कोरडगाव चौकात येण्याची धमकी देण्यात आली.

त्यामुळे मानसिक तणावात असलेल्या बाबासाहेब धायतडक यांनी सकाळी ९.३० वाजता घरून निघून आपल्या शेतात लिंबाच्या झाडाला गळफास घेत आत्महत्या केली. मृत्यूपूर्वी त्यांनी गावातील व्यक्तींना व्हॉट्सपवर एक चिठ्ठी पाठवली होती, ज्यात 'बाळासाहेब बबन गर्जे यांच्या धमक्यांना कंटाळून आत्महत्या करीत आहे' बाळासाहेब आज दहा वाजता पाथर्डी कोरडगाव चौकात हाणार होता म्हणून आत्महात्या करीत आहे असे लिहुन शेवटी स्वतःची सही केली आहे.

सदर घटनेबाबत पाथर्डी पोलीस ठाण्यात फिर्यादी सचिन बाबासाहेब धायतडक यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक विलास पुजारी हे करीत आहेत.

# अय्यप्पा मंदिराचा ३१ वा वर्धापन दिन उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** मधील सावेडीतील आयप्पा मंदिराचा ३१ वा बर्धापनदिनमोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.त्यानिम्मित विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले तर आज संध्याकाळी निघालेली शोभायात्रा मधील तालापोल्ली व चेंडमेलम सावेडीकराचे आकर्षण ठरले अशी माहिती अध्यक्ष के के शेट्टी यांनी दिली.

सावेडीतील श्री अय्यप्पा मंदिर हे अत्यंत आकर्षक असून त्याची उभारणी ३० वर्षांपूर्वी झाली यामध्ये अय्यप्पा स्वामी, गणपती व सरस्वतीची स्वतंत्र मंदिरे आहे, यास ३० वर्षे पूर्ण झाली असून वार्षिक वर्धापन दिना निमीत पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रम झाले यामध्ये विविध पूजा, महागणपती हवन, उषा पूजा, महामृत्युंजय हवन, कलश पूजा हरी वरासम संपन्न झाली.

# तेजज्ञान फाउंडेशनचा 'ग्रंथ रथ' हा अभिनव उपक्रम

## संजय सपकाळ; भिंगार शहरात ग्रंथ रथ सवलतीच्या दरात पुस्तके उपलब्ध करणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** तेजज्ञान फाउंडेशनच्या वतीने साकारण्यात आलेल्या ग्रंथ रथ या अभिनव उपक्रमाचे भिंगार शहरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. वाचन संस्कृती रुजविण्याबरोबरच समाजात सकारात्मक विचारांची प्रेरणा देणारा हा ग्रंथ रथाचे हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

तेजज्ञान फाउंडेशनच्या माध्यमातून प्रकाशित करण्यात आलेली हॅपी थॉट्स ही वैचारिक व प्रेरणादायी पुस्तके, विविध विषयांवरील ग्रंथसंपदा,



तसेच महापुरुषांची चरित्रे यांचा खजिना वाचकांसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. संपूर्ण भिंगार शहरात हा ग्रंथ रथ सवलतीच्या दरात पुस्तके उपलब्ध करुन देत आहे.

तेजज्ञान फाउंडेशनच्या ग्रंथ रथाच्या उद्घाटनाप्रसंगी सुनील कर्डिले, वसंत राठोड, रावसाहेब कोकणे, चंद्रशेखर देशपांडे, कृष्णन नायर, केशव कराळे, रुक्मिणी नायर, रमेश वराडे, सुभाषराव सोनवणे, हेमंत खेरे, गोरक्ष दळवी, विजय कांबळे, किरण धाडगे, सुनील बिंदे, राजेंद्र सांगळे, सुभाष दिघे, किरण शिंदे, चंद्रशेखर देशपांडे, हेमंतकुमार बोरसे आदी उपस्थित होते.

तेजज्ञान फाउंडेशन मागील २५ वर्षापासून हॅपी थॉट्सच्या ग्रंथांचा प्रचार-प्रसार करत आहे. पुस्तक प्रदर्शनाबरोबरच रक्तदान शिबिर, वृक्षारोपण व सामाजिक विषयावर जनजागृती केली जात आहे. वाचन संस्कृतीच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक, शारीरिक, अध्यात्मिक व मानसिक क्रांती घडविण्याचे कार्य सुरु आहे. भारतात ४५० सेंटर तर विदेशात २५ सेंटर आहेत. हॅपी थॉट्सची ४०० च्यावर पुस्तके सात भाषांमध्ये प्रकाशित झालेली असून, जगभर त्याला मागणी असल्याची माहिती फाऊंडेशनच्या समन्वयकांनी दिली.

> तेजज्ञान फाउंडेशनने वाचन संस्कृती रुजवित आहे. युवकांना दिशा व मुलांना संस्कार रुजविण्यासाठी हॅपी थॉट्स बरोबर महापुरुषांचे विचारांवर असलेली पुस्तके नवीन पिढीला दिशादर्शक ठरणार आहे. मोबाईल मध्ये गुंतलेल्या पिढीला दिशा देण्यासाठी आणि वाचन संस्कृती रुजविणारी ज्ञानप्रसाराची ही चळवळ प्रेरणादायी आहे. तेजज्ञान फाउंडेशनचे संस्थापक तेजगुरू सरश्री यांनी पुणे येथून सुरू केलेली ही चळवळ भारतासह विदेशात विस्तारली गेली आहे.
>
> **– संजय सपकाळ**

# पोलीस ठाण्याच्या आवारात तरुणांची झटापट

## शांतता भंग केल्या प्रकरणी गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी पोलीस स्टेशनच्या आवारात शेतीच्या वादातून चार इसमांमध्ये आरडा-ओरड व शारीरिक झटापट झाल्याची घटना घडली. यामुळे सार्वजनिक शांतता भंग झाली असून, याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक महादेव वालचंद गुट्टे यांच्या फिर्यादीवरून संबंधित चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.१३ जून रोजी दुपारी पावणे दोन वाजण्याच्या सुमारास पाथर्डी पोलीस स्टेशनच्या कक्षामध्ये पोलिस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, महिला पोलीस कर्मचारी धाणे व पोलिस नाईक




विनोद मासाळकर उपस्थित होते.

यावेळी इसम नामे जमील बिलाल शेख,नबील बिलाल शेख (दोघे रा. पाथर्डी),भास्कर सर्जेराव दराडे (रा. पागोरी पिंपळगाव),पांडुरंग काशिनाथ शिरसाठ (रा. पिंपळगाव टप्पा) हे आपसातील शेतीविषयक वाद घेऊन पोलीस स्टेशनमध्ये आले होते.

उपनिरीक्षक गुट्टे यांनी वाद हा दिवाणी स्वरूपाचा असून, तो न्यायालयात सोडवावा व शांतता राखावी, असे समजावून सांगितले. मात्र या चौघा इसमांनी पोलीस स्टेशनच्या आवारातच एकमेकांशी मोठ्याने आरडा-ओरड करत शारीरिक झटापट केली. यामुळे पोलीस स्टेशन परिसरात सार्वजनिक शांततेचा भंग झाला.

या घटनेनंतर पोलीसांनी तात्काळ हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली. संबंधित आरोपींवर कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'अंनिस' विषयी समाजमनात आदर : राज्याध्यक्ष बावगे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सत्याची आणि वैचारिक-विवेकी विचारांची चळवळ असल्याने इतर कोणत्याही संघटने पेक्षा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संघटने बद्दल आणि कार्यकर्त्यांविषयी समाजमनामध्ये आदराची भावना आहे,असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे नवनिर्वाचित राज्य अध्यक्ष माधव बावगे यांनी केले.

गुरुवार (दि. १२) रोजी दुपारी ३ वाजता अहिल्यानगर येथे जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद भारुळे यांच्या निवासस्थानी श्री.माधव बावगे यांचे प्रमुख उपस्थितित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अहिल्यानगर जिल्हा बैठक पार पडली. यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. राज्य सल्लागार कॉ. बाबा आरगडे, राज्य प्रधान सचिव डॉ. ठकसेन गोराणे, बुवाबाजी संघर्ष विभाग राज्य कार्यवाह अँड. रंजना गवांदे, जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद भारुळे, जिल्हा प्रधान सचिव विनायक सापा व देवदत्त साळवे, निधी संकलन कार्यवाह प्रा. अशोक गवांदे,



जिल्हा सोशल मीडिया कार्यवाह सुखदेव फुलारी, छायाताई बंगाळ, शशिकांत गायकवाड, संजय वाल्हेकर, अरविंद सोनटक्के, भारतभुषण भागवत, ललित भारुळे, भावना भारुळे, गोरक्षनाथ रिंधे, संभाजीराव माळवदे आदी या बैठकीस उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी महाराष्ट्र अंनिसचे निर्वाचित अध्यक्ष माधव बावगे, नवनिर्वाचित राज्य प्रधान सचिव डॉ. ठकसेन गोराणे, बुवाबाजी संघर्ष विभाग राज्य कार्यवाह ऍड.रंजना गवांदे यांचेसह गौरव ग्रंथ प्रकाशनानिमित्त कॉ.बाबा आरगडे व स्व.सोपानराव दरंदले पत्रकार रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सुखदेव फुलारी यांचा जिल्हा अंनिसच्या वतीने सत्कार करण्यात आला.

बावगे पुढे म्हणाले की, नगर जिल्हा हा पुरोगामी परिवर्तनवादी विचारसरणीचा जिल्हा आहे. या जिल्ह्यात संघर्षातून संघटना तयार झालेली आहे. अंनिस ही कृतीशील, विवेक विचारांची पेरणी करणारी आहे. आजकाल लोकांना काय बरं वाटतं यासाठी आपले विचार सोडून खरं बोलण्यापेक्षा बरं बोलण्याची सवय लागलेली आहे. अंनिस ही देवाधर्माच्या विरोधीतील चळवळ नाही.तर याबाबत भारतीय राज्य घटनेत जे नमूद आहे त्याला अनुसरून, तटस्थतेची भूमिका घेऊन सामाजिक परिवर्तनाचे काम करणारी संघटना आहे. शोषण, फसवणूक व दिशाभूल करणार्या अंधश्रद्धांना विरोध करणे, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार, प्रसार व अंगीकार करणे,धर्माचीविधायक, कृतिशील, कालसुसंगत चिकित्सा करणे, संत समाज सुधारकांचा वारसा व संविधानाचा मूल्याशय कृतिशील करणे आणि व्यापक समाज परिवर्तनाच्या चळवळीशी जोडून घेणे या पंचसूत्रीवर संघटना काम करते.

# प्रकाश बोटकर यांचे निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** कवडे नगर, बालिकाश्रम रोड येथील रहिवासी प्रकाश रामचंद्र बोटकर (७४)



यांचे (दि.१४) पहाटे साडेचार वाजता निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. ते सेवानिवृत्त ट्रेझरी खाते मधील कर्मचारी होते. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा व दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे.

# व्यापाऱ्याची साडेतेरा लाखांची फसवणूक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील रूईछत्तीशी येथील शेतकर्याची विमाननगर, पुणे येथील व्यापायनि १३ लाख ५७ हजार ८८५ रूपयांची फसवणुक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी बुधवारी नगर तालुका पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

रामकृष्ण नामदेव दरंदले (वय ४७) असे फसवणुक




झालेल्या शेतकर्याचे नाव असून त्यांनी यासंदर्भात फिर्याद दिली आहे. सुरेश प्रसाद नामक व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २३ जानेवारी २०२४ रोजी रात्री ८ वाजता ते ७ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ९.४७ च्या दरम्यान, रूईछत्तीशी येथील शिवारामध्ये मका विक्रीचा व्यवहार करण्यात आला होता. फिर्यादी दरंदले यांनी एकूण ३० लाख ५७ हजार ८८५ रूपयांची मका सुरेश प्रसाद याला विकला. सुरूवातीला सुरेश प्रसाद याने १७ लाख रूपये अदा करून विश्वास संपादन केला. मात्र, उर्वरित १३ लाख ५७ हजार ८८५ रूपयांची मागणी दरंदले यांनी वारंवार फोनवरून केली असताना, सुरेश प्रसाद याने टाळाटाळ करत उडवाउडवीची उत्तरे दिली आणि रक्कम दिली नाही. दरम्यान, सुरेश प्रसाद हा उर्वरित पैसे देत नसल्याचे दरंदले यांच्या लक्ष्यात आल्यानंतर त्यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रार केली होती. त्या तक्रारीची चौकशी झाल्यानंतर यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक रमेश गांगर्डे करीत आहेत.

# घरकुले मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार

## अ‍ॅड. अरुण जाधव; खर्डा येथे कानिफनाथ वस्तीजवळ पारधी समाजाची घरकुलासाठी बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** ठक्कर बाप्पा योजनेतून आदिवासी पारधी समाजाला ग्रामपंचायतच्या सहकार्याने जागा व घरकुले मिळण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे उद्गार वंचित बहुजन आघाडीचे अँड.अरुण जाधव यांनी सांगितले.

ते खर्डा येथे कानिफनाथ वस्ती जवळ पारधी समाजाची घरकुलासाठी बैठक नुकतीच पार पडली त्यावेळी ते बोलत होते. बैठकीचे अध्यक्षस्थानी



खर्डा गावचे सरपंच संजीवनी पाटील ह्या होत्या,

तसेच वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते अरुण जाधव यांनी सरपंचाचे विशेष कौतुक केले. तसेच आदिवासी पारधी समाज यांना ठक्कर बाप्पा योजना अंतर्गत घरकुल मिळण्यासाठी जे प्रयत्न लागेल ते मी व ग्रामपंचायत एकत्र येऊन करू जसे की मदारी समाजांना यशवंतराव मुक्त वसाहत योजने अंतर्गत घरकुले मिळाले. तसे ठक्कर बाप्पा योजनेसाठी आपण प्रयत्न करून आदिवासी समाजाची वसाहत लवकरात लवकर उभी करण्यासाठी प्रयत्न करू असे जाधव यावेळी म्हणाले.

या कार्यक्रमासाठी मार्केट कमिटीचे संचालक वैजिनाथ पाटील, विशाल पवार, वंचित चे तालुका अध्यक्ष आतिश पारवे, राजू शिंदे, नीता इंगळे, उर्मिला कवडे,राणी खटावक, लहू पवार, ललिता काळे, चंद्रकला पवार, लक्ष्मी काळे, सचिन शिंदे, फकीर मदारी, हुसेन मदारी आदीसह महिला व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

> पारधी समाजाला घरकुल व घरासाठी जागा, पाण्याची सोय, लाईटची सोय हा प्रश्न आम्ही ह्या महिन्यांमध्ये सोडवू व लवकरच आदिवासी समाजांला प्रत्येकी एक गुंठा जागा देऊन ग्रामपंचायत ठराव घेऊन घरकुलाची मागणी करणार आहे.
>
> **– संजीवनी पाटील, सरपंच**




# विस्तारलेल्या जगाकडे कल्पक्तेच्या नजरेने पहा

## जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांना आवाहन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** नदीजोड प्रकल्पाचा उद्देश काय आहे, हे समजून घेऊन जलसंपदा विभागाने काम सुरू केले आहे. 'मोठा विचार करा' मंत्र अंगीकारून महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलण्याचा निर्धार केला आहे. उपलब्ध साधनांमध्ये राज्य दुष्काळमुक्त करण्याकडे वाटचाल करायची, हेच ध्येय असले पाहिजे. विस्तारलेल्या जगाकडे विस्तारलेल्या नजरेने पाहायला शिका, असे आवाहन मी जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांना केले आहे.

चाकोरीच्या बाहेर जाऊन विचार केल्याने यश मिळते. नदीजोड प्रकल्प फक्त सादरीकरणा पुरता राहणार नाही. महाराष्ट्र पाणी परिषदेने पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे, असे मी मानतो. पंतप्रधान व मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली ती पार पाडण्यात यश येईल, असा आत्मविश्वास वाटतो. महाराष्ट्राला प्रगतिपथावर नेणे, हाच नदीजोड प्रकल्पाचा एकमेव उद्देश आहे. पाणी आपल्याला एकत्र आणणारे साधन आहे. आपल्या उद्याच्या पिढ्यांसाठी पाणी जपून ठेवण्याकरिता आज एकत्र काम करायला हवे! त्यासाठी महाराष्ट्र सरकार कटिबद्ध असल्याचा विश्वास जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

जगाकडे पाहत देशाच्या भविष्याचा विचार करणारे पंतप्रधान मोदी नदीजोड प्रकल्पाबाबत आग्रही आहेत. त्यातून विकासाची गंगा दूरपर्यंत पोहोचेल, असा ठाम विश्वास व्यक्त करून, मंत्री विखे पाटील म्हणाले की, दिवंगत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या स्वप्नाला मूर्त रूप देण्यासाठी नदीजोड प्रकल्पाची कामे आता गतीने पुर्णत्वास नेणे यासाठी केंद्र आणि राज्य सरकारचे प्रयत्न आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र सरकारही त्या दिशेने ठोस पावले उचलत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी जलसंपदा खात्याचे कामकाज अडीच वर्षे पाहिले. त्यांनी खात्यातील कामकाजाला नवे रूप दिले. त्यांनीच नदीजोड प्रकल्पाला सर्वाधिक गती दिली. पाण्यावाचून तळमळणाऱ्या महाराष्ट्रातील दुष्काळी भागासाठी हे प्रकल्प वरदान ठरणारे आहेत. हे लक्षात घेऊनच राज्य सरकारच्या यंदाच्या अंदाजपत्रकात नदीजोड प्रकल्पांसाठी भरीव तरतूद करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

नदीजोड प्रकल्पामुळे बीजिंगमधील पाण्याचे दुर्भिक्ष्य संपले. या महानगराची वाटचाल 'पाण्याचा तुटवडा' येथपासून 'मुबलक पाणीपुरवठा' येथपर्यंत झाली. कॅलिफोर्नियाची अर्थव्यवस्था मेक्सिकोच्या तिप्पट आहे. याचे कारण, त्या राज्याच्या दुष्काळी, टंचाईग्रस्त भागामध्ये त्यांनी ३० वर्षांपूर्वी नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून पाणी पोहोचविले. म्हणजेच नदीजोड प्रकल्प इतर देशांमध्ये यशस्वी होतात, तर महाराष्ट्रात का होणार नाही?

याकडे लक्ष वेधून 'धरण झाले, कालवा येईल, आमच्या शेतीला पाणी मिळेल. त्यामुळे माझ्या मुलाचे लग्न होईल!' अशा भावनीक प्रतिक्रीया ज्यावेळी ग्रामीण भागातून व्यक्त होतात, त्यावेळी सिंचनाचे प्रकल्प समाजजीवनावर कसे परिणामकारक ठरतात याचाही विचार होणे गरजेचे वाटते.

### महाराष्ट्र पाणी परिषदेची स्थापना करून प्रस्ताव सादर

नदीजोड प्रकल्पाची कल्पना महाराष्ट्रासाठी नवीन नाही. दिवंगत माजी केंद्रीय मंत्री बाळासाहेब विखे पाटील आणि दिवंगत ज्येष्ठ नेते गणपतराव देशमुख यांनी २५ वर्षांपूर्वी हा विचार मांडला. तहानलेल्या ग्रामीण महाराष्ट्राची जाण या दोन्ही नेत्यांना होती आणि त्यामुळेच ते १९९५ पासून या मुद्द्यावर काम करीत आले. त्याचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र पाणी परिषदेची स्थापना करून विविध प्रस्ताव सरकारपुढे सादर केले.



### परिषदेच्या कामाबाबत आस्था दाखविणारे फडणवीस पहिले मुख्यमंत्री

महाराष्ट्र पाणी परिषदेच्या माध्यमातून २००० ते २०१६ या काळात सातत्याने चर्चा घडवून आणली. तज्ज्ञ, अभ्यासक, ग्रामीण भागाशी नाळ जुळलेले नेते यांच्या बैठका आयोजित करून सरकारकडे प्रस्ताव सादर केले. आंतरखोरे पाणी परिवहनाची कल्पनाही संस्थेने मांडली. परिषदेच्या अभ्यासानुसार १३ नद्या जोडल्यामुळे महाराष्ट्रात ३०० टी. एम. सी. पाणी उपलब्ध करणे शक्य होते. या योजनेद्वारे महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले. बाळासाहेब विखे पाटील यांच्या उपस्थितीतील शेवटची बैठक ३१ जानेवारी २०१६ रोजी पुण्यात झाली. त्यास फडणवीस उपस्थित होते. परिषदेच्या कामाबाबत आस्था दाखविणारे ते पहिले मुख्यमंत्री ठरले. याचा विशेष उल्लेख मंत्री विखे पाटील यांनी केला.

# रिपाइंकडून कर्जत पंचायत समिती कार्यालयाबाहेर आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट यांच्या वतीने कर्जत पंचायत समितीच्या कार्यालयाबाहेर सोमवार दिनांक १६ जून रोजी जागरण गोंधळ, किर्तन, ढोल बजाओ असे आंदोलन करण्यात येणार आहे. अशी माहिती पक्षाचे उत्तर महाराष्ट्राचे उपाध्यक्ष अंकुश भैलुमे व युवक जिल्हा उपाध्यक्ष विशाल काकडे यांनी पत्रकारांना दिली.

कर्जत पंचायत समितीमध्ये विविध न्याय हक्कांसाठी व सर्व पंचायत समितीच्या विभागांची चौकशी करण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. यामध्ये सन २०२३, २४ यामध्ये तालुक्यात झालेल्या विहिरींच्या प्रस्तावाची झालेल्या तपासणीचा सर्व अहवाल मिळावा. यामध्ये जोशी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणत्या पद्धतीची कारवाई करण्यात आली याबाबत ही माहिती देण्यात यावी. सिंचन विहिरीचे जिओ टॅग व स्थळ पाहणी फोटो. याच प्रमाणे पशुसंवर्धन विभागाच्या मार्फत गाय गोठ प्रकरण करण्यासाठी जनावरांसाठी देण्यात आलेले दाखले व त्याचे जिओ टॅग फोटो याची माहिती मिळावी.

याशिवाय यारी क्रेनच्या मदतीने न खोदलेल्या विहिरींची माहिती व त्यावरील मजुरांची यादी मिळावी व ज्या ठिकाणी मजूर न लावता मशीनच्या साह्याने खोदकाम केलेला आहे त्या विहिरींची चौकशी करून दोष अधिकारी कर्मचारी यांच्यावर काय कार्यवाही करण्यात आली याचा अहवाल मिळावा. तालुक्यात झालेले सर्व पानंद रस्ते त्यासाठी आलेला निधी तसेच किती पानंदरस्त्यांचे काम सुरू झाले आहे.

पूर्ण झालेले रस्त्यांची माहिती यामध्ये मजुरांच्या वापर ही मशीनद्वारे काम करण्यात आले व मजुरांचे जिओ टॅग फोटो या सर्व माहिती मिळाव्यात या शवाय नवबौद्ध समाजाला मिळणाऱ्या विविध शासकीय योजना तालुक्यातील सर्व ग्राम पंचायत व नगरपंचायत यांनी मागासवर्गीयांसाठीचे १५%, ३%, १०% हा निध खर्च केला आहे का आणि केला असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी अनेक ठिकाणी हा निधी खर्च करण्यात आलेला नाही.यामुळे संबंधित ग्राम पंचायतीच्या विस्तार अधिकारी व ग्रामसेवक यांच्यावर कारवाई केली आहे का नसेल तर त्याची माहिती देण्यात यावी यासह विविध मागण्यांसाठी या आंदोलन करण्यात येणार आहे अशी माहिती आंदोलकांनी दिली.



अहिल्यानगर : अहमदाबाद येथील विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना काल नगरमधील सावेडीत विनायकराज प्रतिष्ठानच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

# खर्डासह परिसरातील कायदा व सुव्यवस्था राखली जाईल : स. पो. नि. राजपूत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** खर्डा व परिसरातील कायदा व सुव्यवस्था राखली जाईल यामध्ये कोणाचीही केली जाणार नसल्याचे प्रतिपादन नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांनी सांगितले. ते खर्डा प्रेस क्लबच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात बोलत होते.



यावेळी खर्डा प्रेस क्लबचे अध्यक्ष संतोष थोरात, पत्रकार दत्तराज पवार, बाळासाहेब शिंदे, किशोर दुशी यांनी आपले मनोगत व्यक्त करून पोलीस प्रशासनाने पत्रकारांना सहकार्य करण्याचे आवाहन केले.

उज्वलसिंह राजपूत म्हणाले की, मला पोलीस खात्यात काम करण्याचा अनुभव आहे. मी मुंबई,नाशिक, येवला व अहमदनगर या ठिकाणी काम केले आहे.

खर्डा येथील पोलीस ठाण्यात मी सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून काम करताना कायदा व सुव्यवस्था राखली जाईल तसेच मुलींच्या छेडछाड, गुन्हेगारी प्रवृत्तीचा बीमोड करणार असल्याचे सांगितले. त्याचबरोबर येथील पत्रकारांना सर्वतोपरी सहकार्य करू असे शेवटी बोलताना ते म्हणाले.

याप्रसंगी धनसिंग साळुंखे, रिजवान बागवान, पोलीस कॉन्स्टेबल शेषराव मस्के,अमोल कोठावळे उपस्थित होते.

# संगमनेरमध्ये 'महसूल'ने वाळूचे ट्रॅक्टर पकडले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** संगमनेर तालुका आणि वाळू तस्करी हे सूत्र नवीन नसले तरीही त्यातून समोर येणाऱ्या घटना मात्र मजेशीरच असतात. अशीच एक मजेशीर घटना तालुक्याच्या पठारभागातून समोर आली आहे. तहसीलदारांच्या सूचनेनंतर कारवाईसाठी पोहोचलेल्या मांडव्याच्या तलाठ्यासह तिघांच्या पथकावर वाळूतस्कारांनीच दांडगाई करीत त्यांना कारवाईपासून रोखले आणि धक्काबुकी करीत वाळूने गच्च भरलेले ट्रॅक्टरही पळवून नेले. या प्रकाराने भेदरलेल्या तलाठ्याने घडला प्रकार तहसीदारांना सांगितल्यानंतर या प्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात मांडव्यातील दोघा वाळूतस्करांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेतून संगमनेर तालुक्यातील वाळुतस्करांची मुजोरी ठळक होण्यासह तिघांच्या पथकाला दोन वेगळ्या घटनांमध्ये प्रत्येकी एकाला पकडता येवू नये यावरुन संशयही निर्माण झाला आहे.

याबाबत मांडवे बु. येथील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) अभिषेक गोर्डे यांनी घारगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार गुरुवारी (ता.१२) सकाळी साडेनऊच्या सुमारास मांडवे बु. येथील बाचकर वस्ती परिसरात वाळू उपसा सुरु असल्याची माहिती देत तहसीलदारांनी कारवाईचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे गोर्डे यांनी साकूरमधून महसूल सेवक असिफ शेख व शिवनाथ कातोरे यांना दुचाकीवर सोबत घेत मांडव्याचा प्रवास सुरु केला असता काही वेळात बाचकर वस्तीजवळून त्यांना विनाक्रमांकाचा एक ट्रॅक्टर ट्रॉलीसह दिसला. त्याला थांबवून तपासणी केली असता त्यात गच्च वाळू भरल्याचे आढळले. यावेळी चालक गोरख भागा बाचकर याच्याकडे परवाना मागितला असता त्याने उडावा उडवी करीत पथकातील तिघांनाही शिवीगाळ व धक्काबुकी करीत त्यांना न जुमानता ट्रॅक्टर घेवून तेथून पळ काढला.

त्यानुसार अभिषेक गोर्डे यांच्या तक्रारीवरुन घारगाव पोलिसांनी गोरख भागा बाचकर (चालक) व दत्तु राधा बर्डे (चालक व मालक, रा.मांडवे बु.) या दोघांवर भारतीय न्यायसंहितेच्या कलम १३२, ३०३ (२) प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली असून पुढील तपास पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार गांधले करीत आहेत. या घटनेने संगमनेर तालुक्यातील वाळु तस्करांची दांडगाई पुन्हा एकदा समोर आली असून महसूल प्रशासनाने अशा प्रवृत्ती विरोधात अधिक कठोर भूमिका घेण्याची गरज आहे, अन्यथा काळ सोकावण्याचीही शक्यता आहे.

एकाच दिवशी काही मिनिटांच्या अंतराने एकाच भागात घडलेल्या या दोन्ही प्रसंगांनी मांडव्याच्या तलाठ्यावर संशय निर्माण केला आहे. शासकीय वलय सोबत घेवून मांडवे बुद्रूकच्या तलाठ्यांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी दोन ट्रॅक्टर पकडले. यावेळी त्यांच्यासोबत अन्य दोघे तर समोर फक्त ट्रॅक्टर चालक होता. असे असतानाही दोन्ही घटनांमध्ये त्यांनी ट्रॅक्टरचालकाची दांडगाई नमूद केल्याने काहीसे आश्चर्य निर्माण झाले आहे. एरव्ही सर्वसामान्य शेतकऱ्यांना किरकोळ कामासाठी अक्षरशः नाकीनऊ आणणाऱ्या महसूल विभागाच्या पथकाकडून एकट्या असलेल्या वाळू तस्करासमोर नांगी टाकण्याचा हा प्रकार संशयास्पद असून तहसीलदारांनी या घटनेची दुसरी बाजूही तपासण्याची गरज आहे.

# शिवराज्यभिषेक सोहळ्यानिम्मित रायगडावर प्लास्टिक मुक्ती अभियान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**साकुरी :** युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्य भिषेक सोहल्या निममीत पुणे येथील रण झुंजार शिलेदार टीम च्या वतीने रायगड किल्यावर प्लॅस्टिक मुक्त अभियान राबवण्यात आले मगिळ चार वर्षापासून या टीमच्यावतीने रायगड किल्यावर हे अभियान राबवण्यात येत आहे.



एक वर्षातून किमान चार ते पाच वेळेस काही दिवस या मोहिमेचे आयोजन करण्यात येते ही मोहीम राबवत असताना या टीम ला काही शिवकालीन लोखंडी धातूच्या वस्तु मिळाल्या या वस्तु या टीम ने छत्रपती संभाजी महाराज व संयोगीता राजे छत्रपती यांचे कडे सुपूर्द केल्या सदरील वस्तु रायगड विकास प्राधिकरणाचे वरुण भांबरे यांच्या हस्ते पुरातत्व विभाग यांचे कडे सुपूर्द करण्यात आल्या.

# श्री सद्गुरू यशवंतबाबांच्या पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** सोमवार दि.१६ जून २०२५ ते सोमवार दि.२३ जून २०२५ पर्यंत प् क्षेत्र राममाळ, उंचखडक बु ,(ता.अकोले,) जि.अहिल्यानगर येथे सालाबादप्रमाणे श्री सद्गुरू यशवंतबाबा यांचा ७८ वे पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन केले आहे या निमित्ताने अखंड हरीनाम सप्ताह तथा ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे

श्री क्षेत्र राममाळ येथे नुकताच प्रभू श्रीराम मंदिराचा कलशारोहण व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्सहात पार पडला या सोहळ्यापासून देवस्थानवर दर्शनासाठी अनेक भविक भक्त येत आहे. अतिशय शांत व नयनरम्य अशा या परिसरात सोमवार दि.१६ जून २०२५ रोजी सकाळी ठीक ०९:०० वाजता योगी केशवबाबा चौधरी,ह.भ.प. मनोहरबाबा भोर,ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख(इंदोरीकर) यांच्या मार्गदर्शनाखाली घटस्थापना व धर्म ध्वजारोहण करत या सप्ताह सोहळ्यास प्रारंभ होणार आहे

या संपूर्ण सप्ताह काळात सायंकाळी ०७:०० ते ०९:०० या वेळेत अनेक नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहे व त्यानंतर अन्नदात्यांकडून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेआहे.

सोमवार दि.२३ जून २०२५ रोजी या सप्ताहची सांगता होणार आहे तर या दिवशी सकाळी ०८:०० ते १०:०० या वेळेत दिंडी प्रदक्षिणा व नंतर १०:०० ते १२:०० या वेळेत ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख(इंदोरीकर) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

कीर्तनानंतर समस्त बेलदार समाज महाराष्ट्र राज्य यांचे वतिने महाप्रसादाचा कार्यक्रम होईल सालाबादप्रमाणे देण्यात येणारा श्री सद्गुरू यशवंतबाबा वारकरी जीवन गौरव पुरस्कार(मरणोत्तर) वै.ह.भ.प.नामदेव भिकाजी देशमुख महाराज(सुगाव बु) यांना देण्यात येणार आहे.

तरी या सप्ताह सोहळ्याचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दशरथ सावंत देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष अशोकराव देशमुख ,देवस्थान ट्रस्टचे सरचिटणीस योगी केशवबाबा चौधरी,देवस्थानचे महंत विठ्ठलपंत गोंडे महाराज व सर्व विश्वस्त मंडळाने केले आहे.

# वादळी वाऱ्याने दहिगावमधील शेतकऱ्याची ३५ लाखाची केळी केली भुईसपाट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यामध्ये बुधवार आणि गुरुवार या दोन दिवशी सतत होत असलेल्या वादळी वारे व पावसामुळे तालुक्यातील दहिगाव गावामधील तरुण शेतकरी अरुण आसाराम मुंगसे गट नंबर १७७/२ मधील केळीचे पिक भुईसपाट झाले आहे. सुमारे ३५ लाख रुपयांच्या केळीच्या बागेचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. मुंगसे कुटुंबावर अक्षरशः या दुःखद घटनेमुळे दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अरुण मुंगसे या तरुण शेतकऱ्याने आपल्या शेतामध्ये सात लाखाचे कर्ज काढून तसेच उच्च तंत्रज्ञानाचा वापर करून केळीची शेती उभी केली होती. अगदी सोलापूर मधील श्रीकृष्ण एक्सपोर्ट करणाऱ्या कंपनीने मुंगसे कुटुंबाला माल विकत घेण्याची हमी ही दिली होती. परंतु बुधवारी झालेल्या वादळी पावसामुळे शेतामध्ये उभे असलेले केळीचे पीक काही क्षणात भुईसपाट झाले. आपल्यासमोर उभे असलेले पीक जमीन दोस्त झाल्यानंतर मुंगसे कुटुंब अक्षरशः टाहो फोडत होते.



# .... आता राहुरीत होणार जनावरांचा बाजार

## जनावरे खरेदी-विक्री करता येणार; माजी खा. प्रसाद तनपुरेंच्या हस्ते होणार शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** राहुरी शहरामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून कृषि उत्पन्न बाजार समिती राहुरीचे मुख्यालय विस्तारीकरण आवार (सुतगिरणीशेजारी) येथे जनावरांचा बाजार होणार असल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून मिळाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती असे की, पशुपालक शेतकरी व व्यापारी बंधुनो आता आपले जनावरे खरेदी-विक्री करण्यासाठी इतर बाजारात जाण्याची गरज नाही. आपल्या कृषि उत्पन्न बाजार समिती, राहुरीमध्ये नवीन जागेत जनावरांचा बाजार सुरू होत आहे.

आज, रविवार, दि. १५ जून २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता राहुरीचे मुख्यालय विस्तारीकरण आवार (सुतगिरणीशेजारी) या ठिकाणी भव्य जनावरांचा बाजार शुभारंभ माजी खा. प्रसाद तनपुरे यांच्या हस्ते होणार असून यावेळी विविध मान्यवर उपस्थित राहणार आहे. या जनावरांचा बाजारमधील वैशिष्ट्ये असे की, जनावरे बाजारासाठी भव्य व सुसज्ज प्रांगण आहे. जनावरे उतरविणेसाठी प्रशस्त धक्का, शेडची व्यवस्था करण्यात आली आहे. जनावरांना पिण्याचे पाण्याची स्वतंत्र व्यवस्था असून जनावरे धुण्यासाठी पाण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. तसेच जनावरे विक्रीसाठी आणणाऱ्या शेतकरी, व्यापाऱ्यांसाठी दावणीसाठी व्यवस्था केली असून जनावरे घेऊन येणाऱ्या वाहन धारकांना स्वतंत्र पार्किंग व्यवस्था केली आहे. तर संपूर्ण बाजार परिसरात विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे.

सर्व पशुपालक शेतकरी व व्यापारी बंधुनी कृषि उत्पन्न बाजार समिती राहुरीचे मुख्यालय विस्तारीकरण आवार (सुतगिरणीशेजारी), येथे जनावरांचा बाजार शुभारंभ उपस्थित राहावे, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आलेले आहे.





मा.ना.डॉ.
राधाकृष्ण विखे पाटील
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक -
महेश पा. शेळके
सामाजिक कार्यकर्ते

जलसंपदा मंत्री तथा
अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री
मा.ना.डॉ.
राधाकृष्ण विखे पाटील
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
श्री. सतीश चंद्रभान बावके पाटील
मा. तालुकाध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा, राहाता

जलसंपदा मंत्री तथा
अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री
मा.ना. राधाकृष्ण विखे पाटील साहेब
आपणांस दिर्घायुष्याच्या लाख लाख शुभेच्छा!
|| साई सिध्दी || डेव्हलपर्स
श्री राधाकृष्ण पार्क
NA Plot Residential / Commercial
NA प्लॉट रेसिडेन्सियल कमर्शियल
श्री.अरविंद (आप्पा) कोते पा.
9822904076 | 9130301991
7350501991
साईसिध्दी चॅरिटेबल ट्रस्ट, शिर्डी
साईसिध्दी नागरी सहकारी पतसंस्था, शिर्डी
साईट पत्ता : नगर-मनमाड हायवे राहाता, जिल्हा न्यायालयाजवळ, पिंपळस, ता. राहाता, जि. अहिल्यानगर

जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री
मा.ना.डॉ.
राधाकृष्ण विखे पाटील
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!
- शुभेच्छुक -
आमदार काशिनाथ दाते सर
विधानसभा सदस्य,
पारनेर-नगर विधानसभा मतदार संघ

जलसंपदा मंत्री तथा
अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री
मा.ना.डॉ.
राधाकृष्ण विखे पाटील
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

## कृषि उत्पन्न बाजार समिती
राहाता जि. अहमदनगर

श्री ज्ञानेश्वर (आबा) गंगाधर गोंदकर पा. — मा. सभापती
श्री आण्णासाहेब भाऊसाहेब कडु पा. — मा. उपसभापती

संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री बाबासाहेब पोपटराव शिरसाठ पा. | श्री राहुल मच्छिंद्र धावणे पा. | श्री सचिन फकीरा कानकाटे |
| श्री विजयराव उर्फ राजेंद्र बाबुराव कातोरे पा. | श्री संतोषराव लक्ष्मण गोडे पा. | श्री निलेश कानिफ बावके पा. |
| श्री ज्ञानदेव नारायण चौधरी पा. | श्री शांताराम सोपानराव जपे पा. | श्री बाबासाहेब साक्रुजी कांदळकर पा. |
| श्री दत्तात्रय विठ्ठलराव गोरे पा. | श्री सुभाषराव तुकाराम गायकवाड | सौ. रंजनाताई सोन्याबापू लहारे पा. |
| श्री दिलीपराव विश्वनाथ गाडेकर पा. | श्री राजेंद्र भागवत धुमसे पा. | सौ. मिनाताई भिमराज निर्मळ पा. |
| श्री जालिंदर दगडु गाढवे पा. | | श्री. सुभाष पंढरीनाथ मोटे पा. (सचिव) |

जलसंपदा मंत्री तथा
अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री
मा.ना.डॉ.
राधाकृष्ण विखे पाटील
यांना
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!

## मा. आमदार श्री. राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक्स वाहतूक संस्था लि., प्रवरानगर

मा.श्री. जगन्नाथ बन्सीलाल राठी — चेअरमन
मा.श्री. सुनिल सहादराव पा. जाधव — व्हा. चेअरमन

संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| मा.श्री. भारत प्रभाकर वाकचौरे | मा.श्री. दत्तात्रय कारभारी पा. शिंदे | मा.श्री. तबाजी छबुराव लोखंडे |
| मा.श्री. बाळासाहेब मारुती पा. गोरे | मा.श्री. प्रमोद दत्तात्रय पा. नालकर | मा.सौ.अलकाताई संभाजी पा. आरगडे |
| मा.श्री. शिवाजी भगवानराव पा. इलग | मा.श्री. मारुती नामदेव पा. गायकवाड | मा.सौ. मंदाबाई बबन रांधवणे |
| मा.श्री. मुकुंद भिमराज पा. तांबे | मा.श्री. वाहिद फकीरमोहमद पटेल | श्री. जालिंदर रामभाऊ खर्डे (मॅनेजर) |

स्व.बाळासाहेब विखे पाटील — मा. खासदार
मा.शालिनीताई विखे पाटील — मा. अध्यक्षा, जिल्हा परिषद
डॉ.सुजयदादा विखे पाटील — मा. खासदार
मा.श्री.काशीनाथ दाते — आमदार, पारनेर विधारसभा मतदार संघ
मा.संदिप पाटील वराळ — मा. उपसभापती मा. सरपंच

राज्याचे महसूलमंत्री तथा
अहिल्यानगरचे पालकमंत्री
ना. राधाकृष्ण विखे पाटील
आपणास वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा...!

मा. पुष्पाताई संदीप वराळ पाटील — मा. जिल्हा परिषद सदस्या
मा. चित्राताई सचिन वराळ पाटील — सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत, निघोज
मा.सचिन पाटील वराळ — निघोज-अळकुटी जिल्हा परिषद गटाचे सर्वेसर्वा
मा. माऊली वरखडे — उपसरपंच, ग्रुप ग्रामपंचायत, निघोज

शुभेच्छुक - संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशन | निघोज-अळकुटी जिल्हा परिषद गट | निघोज ग्रुप ग्रामपंचायत व ग्रामस्थ

# माणसं जपणारे मन जिंकणारे

जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री
मा.नामदार डॉ.राधाकृष्ण विखे पाटील
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!

JAHAGIRDAR 7499073130

- शुभेच्छुक -

नितीनशेठ कुंकूलोळ — उद्योजक
श्रीकांत खर्डे पा. — संचालक, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना, प्रवरानगर
धनंजय दळे पा. — मा. संचालक, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना, प्रवरानगर
स्वप्रिल निबे पा. — मा. संचालक, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना, प्रवरानगर
पंढरीनाथ खर्डे पा. — मा. ग्रामपंचायत सदस्य, कोल्हार बु.
ऋषिकेश खांदे पा — कार्यकारी परिषद सदस्य, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर
भरत खर्डे पा. — चेअरमन, कोल्हाळेश्वर पतसंस्था
साईनाथ खर्डे पा. — भाजपा युवा मोर्चा

युवा नेते मा. खा. डॉ. सुजयदादा विखे पाटील मित्र मंडळ, कोल्हार - भगवतीपूर

# लोकयुक्त जलनायक : ना.राधाकृष्ण विखे पाटील

खरंतर राज्यात ज्या कुटुंबाचे नांव अभिमानाने घ्यावे असे कुटुंब म्हणजे विखे पाटील कुटुंब चार पिढ्यांपासून राजकारणासाठी नव्हे तर समाजकारणासाठी अहोरात्र परिश्रम घेणारा हा परिवार.. या परिवाराच्या माध्यमातून सहकार, शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास, पाणी आशा सर्व व्यापक असा दृष्टिकोन ठेवून विकासाचा एक नवा दृष्टिकोन त्यांनी दिला. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना काढला साखर कारखानदारीच्या माध्यमातून शिक्षण ,आरोग्य आणि ग्रामीण विकासाला मोठी चालना मिळाली पद्मभूषण डाॅ. बाळासाहेब विखे पाटील यांनी राज्याचं नव्हे तर देशाचा नेतृत्व करून ग्रामीण भागातील साधी राहणारी माणसं देखील देश हितासाठी मोठं योगदान हे देऊ शकतात हे त्यांनी स्वकर्तृत्वातून दाखवून दिले. तेच काम आज विखे पाटील कुटुंबाची तिसरी पिढी ही करत आहेत खरंतर संस्कारक्षम राजकारणी म्हणून मंत्री विखे पाटील यांच्याकडे पाहिले जाते. आजपर्यंत त्यांनी समाज हिताचे अनेक निर्णय घेत मिळालेल्या प्रत्येक पदाचा उपयोग जनतेसाठी आणि त्या मंत्रीपदाच्या माध्यमातून त्या पदाला न्याय मंत्री विखे पाटील यांनी अतिशय कल्पकतेने करत तो विभाग लोकाभिमुख केला. कृषी मंत्री म्हणून त्यांनी अनेक धडाडीचे निर्णय घेत शाश्वत कोरडवाहू शेती प्रकल्प हा जिरायत भागासाठी परिवर्तन करणारा ठरला. त्यांनी कृषी विभाग हा लोकाभिमुख केला अनेक निर्णय त्यांनी घेत शेतकरी हितासाठी महत्त्वपूर्ण असे काम कृषिमंत्री म्हणून त्यांनी केले. नगर विकास खात्याच्या माध्यमातून काम तर लोकाभिमुख असेच ठरले. परिवहन महामंडळ आणि ह्या परिवहन महामंडळाच्या माध्यमातून त्यांनी केलेलं काम आजही लोकांच्या कायमच स्मरणात राहणार आहे च्या काळात तिकिटामध्ये झालेला बदल त्याचबरोबर शिवशाही बस चा प्रारंभ हा महत्त्वपूर्ण असा निर्णय म्हणावा लागणार आहे. महसूल विभाग हा खऱ्या अर्थाने लोकाभिमुख केला महामंडळाच्या जमिनीचे वितरण वाटप, त्याचबरोबर शिल्लक जमिनीचा उपयोग आजूबाजूच्या गावांना कशा पद्धतीने होऊ शकतो आणि त्या गावचा विकास कसा होऊ शकतो हे त्यांनी दाखवून दिले.विविध दाखले एकाच वेळी देणे,महाविद्यालयांमध्ये सेतू केंद्र, आॅनलाईन सातबारा उतारा असे अनेक निर्णय हे खऱ्या अर्थानं लोकाभिमुख ठरले.

-विनोद पारखे / यमन पुलाटे
(जनसेवा कार्यालय)



**सहकारातून समृद्धी आणि या समृद्धीतून विकसनशील ग्रामीण परिवर्तनाचा ध्यास घेऊन अहोरात्र परिश्रम करणारे राज्याचे दूरदृष्टी आणि लोकाभिमुख असे व्यक्तिमत्व म्हणजेच जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर चे पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील हे होय.आज मंत्री विखे पाटील यांचा ६६ वा वाढदिवस सामाजिक बांधिलकी म्हणून विविध उपक्रमातून संपन्न होत आहे. अशा या समाजभिमुख,वयोवृद्ध , युवक- युवती, महिला यांना बरोबर घेऊन काम करणाऱ्या सामान्य जनतेच्या कर्तृत्ववान नेतृत्वाला वाढदिवसानिमित्त शब्दरूपी मनःपूर्वक शुभेच्छा....**

















































## संपादकीय

# विवाहवेदीवरुन पुढे येणारे वास्तव

आजच्या काळात लग्न हा घरगुती समारंभ राहिला नसून त्याचेही आधुनिकीकरण आणि राजकीयकरण झाल्याचे बघायला मिळते. अजूनही लग्नपरंपरेतील स्त्री शोषणाचा भाग पूर्णपणे संपलेला नाही. आज जुन्या परंपरांचे वैभवीकरण केले जाते, खेरीज त्यामागील बटबटीतपणा आणि जळजळीत वास्तवही अशा काही उदाहरणांवरून समोर येते तेव्हा फोलपणा ठळकपणे जाणवतो. या सगळ्यामागे पैसा ओरबडण्याची प्रवृत्ती आणि पुरुषप्रधान मानसिकता दिसते. ती समाजाच्या सर्व स्तरांमध्ये पहायला मिळते. त्यामुळेच सदर प्रश्नाचे उत्तर शोधायचे तर आपल्याला आधी या मानसिकतेवर काम करावे लागेल. आज पुन्हा एकदा लग्न किती मोठ्या प्रमाणात केले जाते, भेटी कशा दिल्या जातात, डामडौल आणि हौसमौज किती केली जाते याला प्रतिष्ठा मिळत आहे. मधल्या काळात समाजसुधारकांनी केलेल्या कामामुळे मागे पडलेले हे मुद्दे आता नव्याने समोर येत आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये समाजातल्या विविध स्तरांमधील लोकांच्या हाती पैसा खेळू लागताच घरगुती समारंभांचेही राजकीयकरण सुरू झाले. शेवटी अतिरिक्त संपत्ती शोषणातून निर्माण होते, हा सर्वमान्य सिद्धांत आहे. बदलता समाज या सिद्धांताप्रमाणे निर्माण झाला आणि तसेच वागू लागला. गावोगावी गुंठापाटील वाढले तर सरकारी वा खासगी नोकरीत मिळणाऱ्या मोठ्या पॅकेजमुळे, जागतिकीकरणानंतर झालेल्या व्यापारवृद्धीमुळे सामान्यांच्या हातात मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त पैसा खेळू लागला. हाच पैसा पुढे प्रतिष्ठेशी जोडला गेला. जागतिकीकरणाच्या सगळ्या कोलाहलात स्वत:ला एकटे समजणाऱ्या माणसाने आपली ओळख निर्माण करण्याचा मार्ग, मी कोणी तरी वेगळा आहे हे दाखवण्याचा उपाय शोधण्यासाठी पैशाचे प्रदर्शन मोठ्या प्रमाणात सुरू केले. जो तो शक्य त्या सगळ्या संसाधनांचा वापर करून आपले अस्तित्व ठळकपणे मिरवू लागला. कदाचित विवाहसोहळ्याला आलेले अपरंपार महत्त्व आणि त्या निमित्ताने होणारे पैशाचे प्रदर्शन ही बाब या प्रकारांना कारणीभूत ठरली असेल.

अलिकडच्या काळात लग्नालाच नव्हे तर अंत्ययात्रा वा अगदी दहाव्याच्या कार्यक्रमालाही गर्दी जमवली जाऊ लागली. यातूनच माणसाचे मूल्यमापन तो माणूस म्हणून कसा आहे यावरुन न होता, त्याने गर्दी किती जमवली यावरुन होऊ लागले. एखाद्याच्या मागे किती लोक आहेत, हा प्रतिष्ठेचा मुद्दा ठरु लागला. अगदी काही वर्षांपूर्वीपर्यंत महाराष्ट्रात वाढदिवस, विवाहाचे वाढदिवस वा यासारखे सोहळे घरगुती स्वरुपाचे असत. मात्र आता लग्नाच्या वाढदिवसालाही मोठे कार्यालय घेण्याचा प्रघात बघायला मिळतो. प्रत्येक छोट्या-मोठ्या गोष्टीसाठी शुभेच्छा आणि भेटवस्तूंचा पाऊस पडतो. अशा प्रकारे हातातला पैसा कोणत्या ना कोणत्या इव्हेंटमध्ये खर्च करण्याची नवी मानसिकता बघायला मिळत आहे. हे सगळे मुद्दे बदलत्या सामाजिक समस्यांच्या मुळाशी आहेत असे म्हणावे लागेल. पूर्वी राजकारण हा ठराविक गटापुरता मर्यादित विषय होता. मात्र आज राजकारण वेगवेगळ्या स्वरुपात सर्वत्र पसरत आहे. आज प्रत्येक राजकारणी जास्तीत जास्त लोकांमध्ये मिसळण्याची संधी शोधतो. आज पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री अशी सर्व राजकीय मंडळी बिनदिक्कत धनदांडग्यांच्या विवाहसोहळ्यांना हजेरी लावताना दिसतात. हे चित्र बदलण्याची गरज आहे. हे सारे होत असतानाच हुंड्याने समाजात भक्कम जम बसवला आहे, हे वास्तव आहे. आजकाल हुंडा घेतला जात नाही, किंवा अशा चुकीच्या चालीरिती मागे पडू लागल्या आहेत, असे वाटत असेल तर ते सत्य नाही. काळ बदलला तरी हुंड्याची पध्दत बदललेली नाही. आज लग्नात हुंडा मागितला गेला असेल का, सासरचे लोक मुलीचा नीट सांभाळ करतील का, लग्नात खर्च होणारा पैसा कोठून आला असेल यासारखे प्रश्न कोणाच्या खिजगणतीतही नसतात. हगवणे कुटुंबीयांसारखे हैवान मिळाले तरी मुली वा तिच्या माहेरची मंडळी दबावाखाली येऊन न्यायालयाचे दार ठोठावण्यास घाबरतात. यातूनच शक्य तेवढ्या मागण्या पूर्ण केल्या जातात आणि अगदीच नाईलाज झाला की जीवन संपवण्याचा विचार करुन मुली आपली सुटका करुन घेतात. वरच्या वर्गातील साजरीकरणाच्या सर्व पद्धती हळूहळू खालच्या वर्गापर्यंत पाझरत जातात. आज हे वास्तवही अगदी ठळकपणे बघायला मिळते. साखरपुडा, हळद समारंभ, रिसेप्शन यासारखे प्रकार ग्रामीण भागातही मोठ्या धामधुमीत पार पडतात. थोडक्यात, आज ग्रामीण भागातील वधू-वर आपले रोल मॉडेल शहरी भागामध्ये शोधतात आणि त्याचेच अनुकरण करतात. आर्थिक ताण आणि आर्थिक अपेक्षा वाढण्यामागे हा भागही महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागामध्ये नवरीला मंडपात आणण्यासाठी हेलिकॉप्टरचा वापर केला जातो, तेव्हा समाज किती आणि कशा प्रकारे बदलत आहे हे समजते. हे सगळे प्रकार समाजाला चुकीच्या दिशेकडे नेणारे आहेत. यातूनच पैशाचा हव्यास वाढतो. पैशासाठी, चैनीसाठी मुलींचा छळ करण्याची मानसिकता फोफावते. दिखाऊपणा बोकाळतो आणि वैष्णवीसारख्या अनेक भाबड्या कळ्या हकनाक भरडल्या जातात. म्हणूनच आता तरी हे सगळे थांबवणे गरजेचे आहे. त्यासाठी अगदी शालेय पातळीपासून प्रयत्न करावे लागतील. स्त्री कडे पाहण्याची मुलांची मानसिकता बदलावी लागेल. हे काम पुन्हा एकदा नेटाने हाती घ्यावे लागेल. त्यात अवघ्या समाजाला उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे लागेल. त्याला काहीही पर्याय नाही.

# शेवटी चॅलेंजरच किंग ठरले!



अठराव्या टाटा आयपीएल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर बंगळुरू संघाने पंजाब किंग्ज संघावर सनसनाटी विजय मिळवून करंडक जिंकला. दोन्ही संघांनी आजवर आयपीएल चषक जिंकला नसल्यामुळे विजयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. गुजरातचा संघ अंतिम सामन्यात नसल्याने उत्कृष्ट खेळासाठी स्टेडियममधील दर्शकांचा दोन्ही संघांना पाठिंबा मिळाला, मात्र विराट कोहलीचे वलय आणि खेळी निर्णायक ठरली.

तमाम भारतीयच नव्हे तर ५० कोटींहून अधिक विश्व क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागून राहिलेल्या अठराव्या टाटा आयपीएल -२०२५ स्पर्धेच्या ३ जून रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अटीतटीच्या टी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर बंगळुरू संघाने पंजाब किंग्ज संघावर सनसनाटी विजय मिळवून करंडक जिंकला. आजवर या मैदानावर झालेल्या तिसऱ्या अंतिम आणि अतिशय रोमहर्षक सामन्यात आयपीएल चषक जिंकण्याचे पंजाब किंग्ज संघाचे स्वप्न अधुरे राहिले. या दोन्ही संघांनी आजवर झालेल्या कोणत्याही आयपीएल स्पर्धेचा चषक जिंकला नव्हता. त्यामुळे दोन्ही संघांनी विजयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. गुजरातचा संघ अंतिम सामन्यात नसल्याने उत्कृष्ट खेळासाठी स्टेडियममधील दर्शकांचा दोन्ही संघांना पाठिंबा असणार हे निश्चित होते. नरेंद्र मोदी स्टेडियमवर जमलेल्या हजारो दर्शकांना ज्याची धाकधुक लागून राहिली होती, त्या पावसाने सामन्यादरम्यान व्यत्यय आणला नाही, हे विशेष म्हणावे लागेल. फलंदाजीला अनुकूल असलेल्या या खेळपट्टीवर नाणेफेक जिंकणाऱ्या संघाचा कर्णधार प्रथम फलंदाजी करण्यास प्राधान्य देईल हे निश्चित होते. यापूर्वी खेळल्या गेलेल्या आठ लढतींमध्ये २०० धावांचा टप्पा ओलांडला गेला, त्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघांनी सहा वेळा विजय प्राप्त केला. परंतु बेंगळुरू संघाचा कर्णधार विराट कोहलीने नाणेफेक जिंकूनही प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा आश्चर्यजनक निर्णय घेतला.

**नोंद**
– शंतनु चिंचाळकर

९ एप्रिलला सुरू झालेल्या या स्पर्धेचे सामने भारताच्या सहा प्रमुख शहरांमध्ये खेळले गेले. आयपीएल स्पर्धेत बंगळुरू संघ आजवर २००९, २०११, २०१६ आणि २०२५ अशा चार वेळा अंतिम सामन्यासाठी पात्र ठरला होता, तर पंजाबचा संघ २०१४ आणि आता २०२५ मध्ये अंतिम सामना खेळत होता. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत अंतिम सामना खेळणाऱ्या दोन संघांमध्ये आजवर खेळल्या गेलेल्या ३६ सामन्यांपैकी दोघांनी प्रत्येकी १८ सामने जिंकले होते. यावरून अंतिम सामन्यासाठी दोन्ही संघांना प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार हे निश्चित होते. दोन्ही संघांनी प्रत्येकी १४ साखळी सामने खेळून नऊ सामन्यांमध्ये १९ गुणांसह विजय मिळवला, तर चार सामने गमावले. या दोन संघांच्या रन रेटमध्ये + ०७१ इतकाच फरक होता. ही या अंतिम सामन्याची चुरस दाखवणारी वैशिष्ट्ये म्हणावी लागतील. अखेर बंगळुरु संघाने १८ वर्षाचा विजयाचा दुष्काळ संपवत करंडक पटकावला. या संपूर्ण स्पर्धेदरम्यान बंगळुरू संघाचा कर्णधार रजत पाटीदार महत्वाचे निर्णय घेताना विराट कोहलीशी सतत सल्लामसलत करत होता. त्यामुळे या स्पर्धेच्या विजेतेपदाचे श्रेय कोहलीलाही जाते.

तुलनेने तुल्यबळ वाटणारे पंजाब आणि बंगळुरू हे दोन्ही संघ यंदाच्या मोसमात तीन वेळा आमने सामने आले. यात बंगळुरूने दोन वेळा बाजी मारली होती. क्वालिफायर – १ लढतीमध्ये पंजाबने केवळ १०१ धावांचे आव्हान बेंगळुरूसमोर ठेवत सपशेल शरणागती पत्करली. हा सामना हरल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यर म्हणाला होता की फलंदाजीतील अपयशामुळे झालेल्या पराभवावर जास्त चर्चा न करता मी फलंदाजांना आपला नैसर्गिक खेळ खेळण्याचा सल्ला दिला आहे. नवोदित खेळाडूंवर दडपण आणून त्यांना त्यांच्या आक्रमक खेळापासून दूर ठेवणे मी उचित मानत नाही. बंगळुरूचा संघ पहिल्या प्ले ऑफमध्ये पंजाबला सहज धूळ चारून थेट अंतिम फेरीत पोहोचला असला तरी मुंबईसारख्या बलाढ्य संघाला पंजाबने पराभवाचा कडवा डोस पाजला, हे अंतिम सामना खेळताना बेंगळुरूच्या संघाला विसरून चालणार नव्हते. पण विजयाची प्रेरणा त्यांना अंतिम विजय प्राप्त करण्यास उपयोगी पडली असे म्हणावे लागेल.

या स्पर्धेत बंगळुरू संघाच्या फलंदाजीची मदार सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विराट कोहली आणि फील सॉल्ट यांच्यावर तर पंजाब संघाची मदार श्रेयस अय्यर आणि प्रभसिमरन सिंग यांच्यावर होती. खास करून मुंबईविरुद्धच्या सामन्यात अश्विनीकुमारने टाकलेल्या १९ व्या षटकात श्रेयस अय्यरने चार षटकार ठोकले होते. त्याने नाबाद रहात ८७ धावांची खेळी केली होती. त्यामुळे त्याच्याकडून तशाच फलंदाजीची अपेक्षा होती. गोलंदाजीत सातत्याने यश मिळवणाऱ्या अर्शदीप सिंग आणि मार्को यान्सेन यांच्यावर पंजाबची तर जोश हेझलवूड आणि कुणाल पंड्या या खेळाडूंवर बंगळुरूची दारोमदार होती. तुलनात्मक अभ्यास करता बंगळुरू संघाला ही स्पर्धा जिंकण्याची जास्त संधी होती. २० षटकांच्या सामन्यांमध्ये, फलंदाजी आणि गोलंदाजीचा समन्वय आणि त्याला क्षेत्ररक्षणाची मिळालेली साथ हे हमखास यशाचे ठरणारे गणित बंगळुरू संघाने या अंतिम सामन्यातही खरे करून दाखवले.

'क्रिकेट इज द गेम ऑफ चान्स' या म्हणीची संपूर्ण स्पर्धेत जाणवलेली प्रचिती अंतिम सामन्यातही जाणवली. फलंदाजीला पोषक अशी खेळपट्टी असल्याने पहिल्या पाच-सहा षटकांमध्ये जास्त धावा करणाऱ्या संघाला जिंकण्याची संधी जास्त असेल, असे तज्ज्ञांचे मत होते. स्पर्धेमध्ये बंगळुरूच्या विराट कोहली आणि फिल सॉल्ट या सलामीवीरांकडून केली गेलेली आकर्षक फटकेबाजी अंतिम सामन्यातही अपेक्षित होती. परंतु तिसऱ्याच चेंडूवर सनसनाटी षटकार ओढत धडाकेबाज खेळाची सुरुवात करणारा सॉल्ट दुसऱ्या षटकातही एक षटकार ओढून झेलबाद झाला. त्याच्या जागी आलेला मयंक अगरवालही कोहलीची साथ न देता लवकर परतला. त्यानंतर आलेल्या कर्णधार पाटीदार आणि कोहलीने सावध खेळ करत धावफलक हलता ठेवला. संघाच्या ९३ धावा फलकावर लागल्या असताना कर्णधार पाटीदार यॉर्करवर पायचीत झाला. मधल्या फळीतील फलंदाजांच्या साथीने कोहलीने संयमी खेळ करत अकराव्या षटकात संघाच्या १०० धावा फलकावर लावल्या. चौदाव्या षटकात संघाची धावसंख्या १३१ असताना दुर्दैवाने तो बाद झाला. त्यानंतर कमी षटके राहिल्याने धावफलक हलता ठेवण्याच्या नादात ठराविक अंतराने बेंगळुरू संघाचे बळी जात राहिले आणि त्यांचा डाव १९० धावांवर आटोपला.

प्रभसीमरनच्या साथीने पंजाबच्या डावाची सुरुवात करणाऱ्या प्रियांश आर्यने पहिलाच चेंडू सीमापार धाडत धडाकेबाज सुरुवात केली. दोघांनी भुवनेश्वरकुमारच्या पहिल्याच षटकात १३ धावा वसूल केल्या. तिसऱ्या षटकात प्रभसीमरनचा झेल सोडून शेपर्डने जीवदान दिले. संघाच्या ४३ धावा फलकावर लागल्या असताना प्रियांश आर्य वैयक्तिक २४ धावांवर बाद झाला. त्याच्या जागी आलेल्या जॉर्ज इंग्लिसने आकर्षक टोलेबाजीचे प्रदर्शन घडवले, पण दुसरीकडे नवव्या षटकात संघाची धावसंख्या ७२ असताना प्रभसिमरन बाद झाला. ज्याच्याकडून पंजाब संघाला धडाकेबाज खेळाची अपेक्षा होती, तो श्रेयस अय्यर दहाव्या षटकात स्वस्तात परतला. त्यावेळी बंगळुरू संघाच्या खेळाडूंनी मैदानात सामना जिंकल्यासारखा आनंद व्यक्त केला. तेराव्या षटकात जॉर्ज इंग्लिस बाद झाल्यावर संघापुढे जिंकण्यासाठी षटकाला १३ धावांची गती ठेवण्याचे आव्हान होते. पण शशांक सिंग आणि नेहल वढेरा यांच्या आक्रमक फलंदाजीने सामन्यात फारशी रंगत टिकवून ठेवली नाही आणि जिंकण्यासाठी २९ धावांची आवश्यकता असलेल्या शेवटच्या षटकापर्यंत उत्सुकता वाढवत गेलेला सामना अखेर रॉयल चॅलेंजर बंगळुरू संघाने जिंकत १८ वर्षांनी विजयी चषकाला गवसणी घातली.

सामन्यातील विजयानंतर, आजवर बंगळुरू संघाकडून सलग १८ वर्षे खेळूनही विजयी चषक हाती न लागलेल्या विराट कोहलीला आनंदाश्रु अनावर झाले. विराटच्या संघातील प्रत्येक खेळाडू त्याला २०२५ चा चषक मिळवून द्यायचाच, असा पण करून मैदानात उतरला होता. त्यांच्या प्रयत्नांचे सार्थक झाले असेच म्हणावे लागेल. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या दर्शकांचा केवळ विराट कोहलीमुळे रॉयल चॅलेंजर बंगळुरू संघाला पाठिंबा होता, हे सामन्याच्या पहिल्या चेंडूपासून जाणवत होते. हीच एका महान खेळाडूची दिसून येणारी जिद्द आणि सातत्यपूर्ण खेळ बंगळुरू संघाच्या विजेतेपदाला कारणीभूत ठरला, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

# महापालिका अधिकाऱ्यांनी ठेकेदाराचे वकीलपत्र न घेता काम करावे

## आ. संग्राम जगताप; मध्यवर्ती शहरातील आनंदी बाजार रस्ता कॉंक्रिटीकरण कामाची पाहणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महापालिका अधिकाऱ्यांनी ठेकेदाराचे वकीलपत्र न घेता काम करण्याच्या सूचना द्याव्यात सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू आहे, रात्री लाईट जात असते. खोदलेले रस्त्या संदर्भात नागरिकांना कळण्यासाठी बॅरिकेटेड, सूचना बोर्ड, दिशादर्शक फलक लावण्याचे काम करावे. विकास कामांमध्ये ''सी'' नावाचे लोक नागरिकांमध्ये दिशाभूल करण्याचे काम करत असतात. मात्र नागरिक विकास कामे पाहून समधान व्यक्त करत आहे.

पावसाळ्यात तर चितळे रोड, आनंदी बाजार, गांधी मैदान, गाडगीळ पटांगण या परिसरात पावसाचे पाणी अक्षरश: नागरिकांच्या दुकानात, घरात तर रस्त्यावरून कमरे एवढे पाणी वाहत असे. या मध्ये अनेक दुर्घटना घडल्या जात होत्या. हा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागावा यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून मोठ्या निधी प्राप्त करून दिला. त्यानुसार जमिनी अंतर्गत पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी १२०० व्यासाची मोठी बंद पाईप गटर टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे.

> नगरकरांचे अनेक वर्षाचे कॉंक्रिटीकरणाच्या रस्त्याचे स्वप्न होते ते पूर्ण करून देण्याचे काम केले आहे. एकट्या केडगावमध्ये १५० कोटी रुपयांची विकास कामे पूर्णत्वाकडे जात आहे. सध्या शहरात उंदीर घुशीचे प्रमाण वाढले असले तरी विकास कामांमुळे ते आता नष्ट होतील. मध्यवर्ती शहरातील ड्रेनेजलाईन, रस्ता कॉंक्रिटीकरणाची कामे यापूर्वी कधीही नियोजनबद्ध झाली नसल्यामुळे नागरिकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत होते.
>
> – संग्राम जगताप, आमदार



त्यानंतर जिल्हा वाचनालय, गांधी मैदान, पटवर्धन चौक, गाडगीळ पटांगण, अमरधाम रस्ता कॉंक्रिटीकरणाचे काम मार्गी लागणार आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांचे अनेक प्रश्न मार्गी सुटणार आहे असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केले.

मध्यवर्ती शहरातील आनंदी बाजार रस्ता कॉंक्रिटीकरण कामाची पाहणी आमदार संग्राम जगताप यांनी केली. यावेळी मा. उपमहापौर गणेश भोसले, आयुक्त यशवंत डांगे, दीपक सूळ, मा. सभापती किशोर डागवाले, गणेश कवडे, मा. नगरसेवक दत्तात्रय तात्या मुदगल, मा. नगरसेवक अजय चितळे, संतोष गेनप्पा, प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, सुहास पाथरकर, कैलास दळवी, शहर अभियंता मनोज पारखे, इंजिनिअर श्रीकांत निंबाळकर, गणेश गाडळकर, अक्षय बल्लाळ, मुकुंद बाळके, गजेंद्र कवडे, रोहन डागवाले, सागर गोरे, वैभव वाघ, राम वाघ, सुनील सूर्यवंशी, मनोज लोंढे, समीर रेखी, बाबासाहेब मुदगल, दत्ता वामन, देविदास मुदगल, सचिन पाथरकर, योगेश गणगले, भैया चितळे, गोरख खंडागळे, अजिंक्य गुरावे, शरद दातरंगे आदी उपस्थित होते.

# पाथर्डी नगरपरिषदेकडून ठेकेदारावर कारवाई

## रात्रीच्या अंधारामुळे अपघातांचा धोका; ठेकेदाराला दुसरी नोटीस, अनामत रक्कम वसूल होणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी नगरपरिषदेच्या हद्दीतील नवीन बसस्टॅंड ते अरिहंत हॉस्पिटल (शेवगाव रोड) या मुख्य मार्गावर सुरू असलेले स्ट्रिट लाईटचे काम दीड वर्षांपासून रखडल्याने अखेर नगरपरिषद प्रशासनाने ठेकेदार संस्थेवर कडक कारवाई केली आहे. मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्या आदेशानुसार, संबंधित ठेकेदाराचा कार्यारंभ आदेश ६ जून २०२५ रोजी रद्द करण्यात आला असून, अनामत रक्कमेतून अपूर्ण कामाचा खर्च वसूल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

सदर काम डिसेंबर २०२३ मध्ये मंजूर करण्यात आले होते. सुमारे ८.८६ लाख रुपये किंमतीच्या या कामात जुन्या पोल्सचा पुनर्वापर करत नवीन पथदिवे बसवण्याची जबाबदारी ठेकेदाराकडे होती. कामासाठी तीन महिन्यांची मुदत देण्यात आली होती. मात्र, दीड वर्ष उलटूनही केवळ पोल उभारण्यासाठी सिमेंट फाउंडेशनच करण्यात आले असून प्रत्यक्षात दिवे बसवलेले नाहीत.

स्थानिक नागरिकांनी फाउंडेशनचा दर्जा अत्यंत निकृष्ट असून, ते तुटण्याच्या स्थितीत असल्याची तक्रार केली आहे. परिणामी, रात्रीच्या अंधारात अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. नागरिकांनी या कामातील दिरंगाईबद्दल तीव्र संताप व्यक्त केला असून, लवकरात लवकर नवीन ठेकेदार नेमून परिसरात प्रकाश व्यवस्था सुरळीत करण्याची मागणी केली आहे.



या कामाच्या दर्जाबाबत आणि विलंबाबाबत ठेकेदारास ३ जानेवारी २०२५ रोजी प्रथम नोटीस बजावण्यात आली होती. मात्र, कोणतीही सुधारणा न झाल्याने दुसरी नोटीस देत ठेकेदारावर कठोर कारवाई करण्यात आली आहे. यापुढे सदर ठेकेदाराला नगरपरिषदेच्या कोणत्याही निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यास अपात्र ठरवण्यात आले आहे.ही कारवाई अहिल्यानगर जिल्हा तांत्रिक बेरोजगार विविध सेवा सहकारी संस्था मर्या. यांच्याविरोधात करण्यात आली असून, ठरलेल्या कालावधीत काम पूर्ण करण्यात संस्थेचे अपयश ठळकपणे दिसून आल्याचे नगरपरिषदेच्या नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.

# अशोक चा पहिला मिल रोलर विधिवत पूजन करून बसविला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अशोकनगर** : अशोक सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ या गळीत हंगामासाठी पहिला मिल रोलर कारखान्याचे चेअरमन माजी आ.भानुदास मुरकुटे, व्हा. चेअरमन हिम्मतराव धुमाळ, कार्यकारी संचालक संतोष देवकर यांचे हस्ते विधिवत पूजन करून बसविण्यात आला.

अशोक कारखान्याच्या आगामी सन २०२५-२६ च्या गळीत हंगामासाठीची हंगामपूर्व मशिनरी दुरुस्ती व देखभालीची कामे प्रगतीपथावर आहेत.

# आ. जगतापांकडून तज्ज्ञ संचालकांचा सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महेश नागरी सहकारी पतसंस्था भिंगारच्या आर्थिक विकासात महत्त्वाचे योगदान दिले आहे. अनेक होतकरु युवक व गरजूंना कर्ज पुरवठा करुन त्यांना पायावर उभे करण्याचे काम केले. उद्योजक, व्यावसायिकांना भांडवल उभारणीत आधार दिला.

पतसंस्थेची विकासात्मक वाटचाल सुरु असून, पतसंस्थेच्या तज्ञ संचालकपदी नियुक्ती करण्यात आलेले डॉ. श्रीकांत गांधी आणि रतिलाल गुगळे यांचा अनुभव संस्थेला अधिक व्यावसायिक आणि धोरणात्मक दृष्टिकोन देईल, तसेच आनखी विकासात्मक दिशेने घेवून जाणारा ठरणार असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

> महेश नागरी पतसंस्था ही आज जेव्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि विश्वासार्ह संस्था म्हणून ओळखली जाते, ते यामागे संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची, संचालकांची आणि कर्मचाऱ्यांची कठोर मेहनत आहे. पतसंस्थेने सर्वांचा विश्वास मिळवला असून, शहरातील मोठी पतसंस्था म्हणून याकडे पाहिले जाते.
>
> – नंदकुमार झंवर

भिंगार येथील महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या तज्ञ संचालकपदी संस्थेचे जेष्ठ संचालक डॉ. श्रीकांत गांधी आणि संस्थापक संचालक रतिलाल गुगळे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा आमदार जगताप यांनी सत्कार केला. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी संस्थापक चेअरमन नंदकुमार झंवर, संचालक मारुती पवार, राष्ट्रवादीचे माजी शहर जिल्हाध्यक्ष प्रा. माणिक विधाते, माजी नगरसेवक संजय चोपडा, राजेंद्र गांधी आदी उपस्थित होते.

# तलवार हातात घेवून दहशत करणारा गजाआड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी शहरातील माणिकदौंडी चौक येथे एक इसम धारदार तलवार हातात घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करत असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत कारवाई करतन राजू नामदेव सानप (वय ३५, रा. शिरसाटवाडी, ता. पाथर्डी) या संबंधित इसमास अटक केली आहे.

पोलिस स्टेशनचे पोलीस नाईक विनोद मासाळकर यांनी फिर्याद दिली असून, मंगळवारी दिवशी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास पोलिस निरीक्षक यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, माणिकदौंडी चौकात एक इसम तलवार हातात घेऊन फिरत आहे आणि परिसरात भीतीचे वातावरण निर्माण करत आहे.

या माहितीच्या आधारे पोलिस कर्मचारी पोलिस हेड कॉन्स्टेबल सुहास बटुळे,भगवान गरगडे, लक्ष्मण पोटे, कळमकर यांनी दोन पंचांना घेऊन घटनास्थळी धाव घेतली. पोलीस व पंचांनी मिळून माणिकदौंडी चौकात सदर इसमाला तलवार हातात घेऊन दहशत माजवताना पाहिले आणि त्याला तत्काळ अटक केली.

चौकशीत त्याचे नाव राजू नामदेव सानप असे समोर आले. सानप याची पंचासमक्ष झडती घेतली असता त्याच्याकडे एक स्टीलची धारदार तलवार सापडली. याच्या विरोधात भारतीय हत्यार कायदा कलम अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# ना. विखेंच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने घेतली भरारी...



जमिनीबाबत व खास करून शेतजमिनी बाबतचे वाद मिटविण्यासाठी श्री. विखे पाटील यांनी महत्त्वाकांक्षी योजना आणली आहे. ती म्हणजे 'सलोखा योजना'. राज्यात जमीन धारकांची खातेसंख्या 3 कोटी 37 लाख 88 हजारांच्या आसपास आहे. एकूण वहिवाटदार शेतकरी एक कोटी 52 लाखांच्या आसपास आहेत. शेतजमिनीच्या ताब्यासंदर्भात एकूण बाधित शेतकऱ्यांची संख्या सुमारे 13 लाख 29 हजार दिसते. राज्य मंत्रीमंडळाच्या 13 डिसेंबर 2022 रोजी झालेल्या बैठकीत सलोखा योजनेला मान्यता देण्यात आली. योजनेची अंमलबजावणी धडाडीने चालू झाली, साधारण दीड वर्षांपूर्वी, म्हणजे 2023मध्ये. शेतीमधील वहिवाटीसंदर्भात होणारे वाद मिटविणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. तिचे महत्त्व काय हे पुढील मुद्द्यांवरून कळते.

नदी, ओढे, नाले यांच्या पात्रातून बेदरकारपणे होणारा वाळूचा उपसा राज्याची डोकेदुखी ठरला आहे. त्यातून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतोच. त्या पेक्षा अधिक गंभीर बाब म्हणजे पर्यावरणाची होणारी हानी. त्यातून अनेक समस्या निर्माण होता. दिवंगत माजी केंद्रीय मंत्री बाळासाहेब विखे पाटील यांनी याचे गांभीर्य जाणले होते. मोठ्या प्रमाणात होणाऱ्या अवैध वाळूउपशाकडे लक्ष वेधत त्यांनी दुष्परिणामांचा इशारा दोन-अडीच दशकांपूर्वीच दिला होता.वाळूचा अनधिकृत उपसा, चोरट्या पद्धतीने अवेळी होणारी वाहतूक या प्रकारांना आळा घालण्याचे राज्यातील महायुती सरकारने ठरविले. ज्यांना वाळू हवी आहे, त्यांना सरकारकडून ऑनलाईन पद्धतीने वाळू व रेती पुरविण्याबाबत सर्वंकष सुधारित रेती धोरण सरकारने आखले. ही संकल्पना श्री. विखे पाटील यांचीच. वाळूच्या विक्रीचे दर 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर ठरविण्यात आले आहेत. वाळूचे हे धोरण महत्त्वाचे आणि दूरगामी आहे.

महसूल विभागाचा प्राण म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालय. या विभागाचे सर्व महत्त्वाचे निर्णय येथूनच होतात व त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीची जबाबदारीही याच कार्यालयावर असते. या कार्यालयाचे हे महत्त्व लक्षात घेऊन खास कृतियोजना म्हणून प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात 'वॉर रूम' स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यात विविध योजना राबविण्यात येतात, त्यावर लक्ष ठेवले जाते.

सामान्य जनतेच्या सोयीसाठी जिल्हा मुख्यालय आणि महानगरपालिका क्षेत्रातील दुय्यम निबंधक कार्यालये आठवड्याच्या शेवटच्या दोन सुट्यांच्या दिवशीही, म्हणजे शनिवारी आणि रविवारीही सुरू ठेवण्याच्या निर्णय महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतला. दस्त नोंदणीसाठी वाट पाहण्याची गरज नागरिकांना त्यामुळे भासणार नाही.



**महसूल विभाग कामकाजाबाबत सगळ्यांत महत्त्वाचा आणि तेवढा किचकट विभाग आहे. या विभागात कामासाठी येणाऱ्यांच्या नशिबी हेलपाटे असतात, असे म्हटले जाते. ज्यांचे काम झटपट होते ते एक मोठे दिव्य पार केल्याच्या आनंदात असतात. महाराष्ट्रात तरी हे चित्र आता पूर्णपणे बदलू लागले आहे. महायुतीच्या सरकारने त्या दृष्टीने खंबीर निर्णय घेतले. त्याची गांभीर्याने अंमलबजावणी करण्याची जबाबदारी राधाकृष्ण विखे पाटील यांनी सक्षमपणे पेलल्याचे दिसते.**

जमिनी, घरे यांच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार अर्थकारणाला चालनाच देत असतात. त्यामुळे राज्य सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. अशा व्यवहारांमध्ये कोणता अडथळा येऊ नये, अशीच धारणा या मागे आहे. नागरिकांना त्यांच्या कामाच्या वेळेत दस्त नोंदणी करणे शक्य होत नाही. या व्यवहारात लक्षणीय वाढ झाल्यामुळे दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी मोठी गर्दी पाहायला मिळते. या सर्व बाबी लक्षात घेऊन नागरिकांना त्यांच्या सुटीच्या दिवशीही दस्त नोंदणी करता यावी या दृष्टिकोनातून हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार विविध ऋऊ विभागांतील जवळपास वीस दुय्यम निबंधक कार्यालये, जिल्हा मुख्यालय आणि महानगरपालिका क्षेत्रातील दुय्यम निबंधक कार्यालये येथे शनिवारी आणि रविवारी नोंदणीचे काम विनाव्यत्यय चालू असते.

कोणतेही सरकार जनतेच्या सोयीसाठी महत्त्वाकांक्षी योजना आखते. महायुती सरकार त्यात आघाडीवर आहे. मंत्रीमंडळाने घेतलेले निर्णय, तयार केलेल्या योजना लोकाभिमुख ठरविण्याची खरी जबाबदारी अधिकाऱ्यांची असते. या योजनांची अधिकारीवर्गास सखोल माहिती असल्यास त्यांची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकते. नेमका हाच विचार करून श्री. विखे पाटील यांनी 'राज्यस्तरीय महसूल परिषद' अशी संकल्पना पुढे आणली. या परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.महसूल आणि वन विभागाच्या माध्यमातून नागरिकांची कामे मुदतीत पूर्ण करण्यासाठी राज्यातील सर्व विभागांच्या दृष्टीने सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्याची गरज श्री. विखे पाटील यांनी वाटली. त्यामुळेच लोणी येथे 22 ते 23 फेब्रुवारी 2023 रोजी राज्यस्तरीय महसूल परिषद आयोजित करण्यात आली. परिषदेस राज्यातील पाचही विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव, दोन्ही विभागांचे प्रधान सचिव, जमाबंदी आयुक्त, नोंदणी महानिरीक्षक, सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी, नोंदणी महानिरीक्षक, भूमिअभिलेख विभागाचे उपसंचालक उपस्थित होते. नवीन वाळू धोरण, विविध दाखल्यांचे वितरण, शासकीय जमिनींवरील अतिक्रमण, शर्तभंग, पाणंद रस्ते, शिवार रस्ते, कब्जेपट्ट्याने दिलेल्या, जमिनींच्या शर्तभंग, ई-चावडी, ई-मोजणी, ई-पीक पाहणी, ई-ऑफीस, सलोखा योजना, भूसंपादन, बिनशेती, तुकडेजोड, तुकडेबंदी अधिनियम अशा विविध विषयांबाबत परिषदेत मार्गदर्शन करण्यात आले. अतिरिक्त मुख्य सचिव, प्रदान सचिव, जमाबंदी आयुक्त, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपसचिव यांनी त्याबाबत तपशीलवार माहिती दिली व शंकानिरसन केले. महसूल परिषदेच्या माध्यमातून सामान्य नागरिकांसाठी विकासाचा मसुदा निश्चित करण्याच्या दृष्टीने पावले उचलली गेली आहेत, असे मानावे लागेल.

गांधीजींचे हे स्वप्न साकार करायचे असेल तर त्या दृष्टीने पावले उचलणे गरजेचे आहे. 'महसूल'सारखे महत्त्वाचे खाते मिळावे असे मंत्रिमंडळातील प्रत्येक सदस्याला वाटते. पण इच्छाशक्ती असेल तरच त्या खात्याचा मंत्री कामाला न्याय देतो. श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनी जास्त न बोलता प्रत्यक्ष कृतीतून स्वतःला सिद्धच केले आहे. विविध निर्णयांद्वारे, योजनांच्या माध्यमातून महसूल विभागाद्वारे सर्वसामान्यांना न्याय कसा मिळेल, हेच त्यांचे उद्दिष्ट आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी त्याबाबत श्री. विखे पाटील यांना पूर्ण स्वातंत्र्य देऊन त्यांच्यावर विश्वास टाकला आहे.

राजकारण आड आले की काम करणारा माणूस व्यथित होतो. कारण नागरिकांची साथ असेल तरच खरे प्रोत्साहन मिळते आणि जनतेसाठी नवीन काही तरी करण्यासाठी ऊर्जा मिळते. हेच लक्षात घेऊन महसूल खात्याच्या लोकाभिमुख निर्णयांना साथ देण्याचा शब्द सुजाण नागरिक या नात्याने आपण सगळे श्री. विखे पाटील यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त देऊ।

-प्रशांत कांबळे
पीआरओ,
ना. राधाकृष्ण विखे पाटील जनसेवा कार्यालय

पुरवणी संकल्पना : श्री. परेश कापसे । संकलन : महेश रत्ताटे, विवेक लोहकने, सागर दोंदे, गणेश सोमवंशी, सुरेश खोसे, जितेंद्र जाधव. जाहिरात डिझाईन : साजिद जहागिरदार































# शिक्षणाचा आत्मनिर्भर 'प्रवरा पॅटर्न'



**"उदात्त मनाची जडणघडण" या ब्रीदवाक्यानुसार लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण उपाधिने सन्मानित) प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेची मा. नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली वर्तमानकालीन शैक्षणिक दिशा आणि दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून कौशल्याधिष्ठीत व रोजगाराभिमुख शिक्षणाचा आत्मनिर्भर 'प्रवरा पॅटर्न' विद्यार्थ्यांना स्वयंपूर्णता, कौशल्यविकास व रोजगारक्षमतेकडे घेऊन जात आहे.**

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील म्हणतात, "आपण इथपर्यंत आलो आहोत. इतरांनाही आपल्याला पुढे न्यावयाचे आहे. आपल्या नशिबाने आपल्याला चांगले दिवस आले आहेत. भावी पिढीलाही असेच चांगले दिवस येतील याची काळजी घ्या." पद्मश्रीचा हाच विचार पुढे नेताना लोकनेते पद्मभूषण खासदार डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये आपली कल्पकता आणि आधुनिक दूरदृष्टी यामधून सामाजिक बदलांचा वेध घेतला. प्रवरा शैक्षणिक संस्थेच्या शाखा विस्तारातील संख्यात्मक वाढी सोबतच गुणात्मकताही जोपासली. महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री मा. नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्याला प्रयोगशीलतेची जोड दिली. सन १९६४ स्थापन झालेल्या प्रवरेच्या विविध शैक्षणिक संकुलांच्या शैक्षणिक विकास कार्याची धुरा आज नामदार साहेब समर्थपणे सांभाळत आहेत.

वर्तमानकालीन बदलांचा वेध घेत असताना विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबत व्यावहारिक ज्ञान मिळावे यासाठी संस्थेचे अध्यक्ष नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील, मा. खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डाॅ. सुश्मिता विखे पाटील यांच्या सम्यक विचारातून कॅम्पस इंटरव्यू, रोजगार मेळावा, बिल्डिंग प्रवरा स्टुडन्ट एक्सपो, प्रवरा सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा महोत्सव, प्रवरा शारदीय नवरात्री उत्सव, प्रवरा सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक, बाल आनंद मेळावा इत्यादी नवोपक्रम प्रवरेच्या विविध शैक्षणिक संकुलात सुरु आहेत. 'सहकारातून समृद्धीकडे... शिक्षणातून विकासाकडे...' अशी अखंड गतिमानता प्रवरा शैक्षणिक संस्थेची सुरू आहे.

विखे पाटील परीवाराचा डीएनए हा शेतकरी, कामगार, मजूर आणि दीन-दलितांसाठी काम करण्याचा आहे. शिक्षण हे 'तृतीय रत्न' आहे. शिक्षणामुळेच मानवी जीवनात अमुलाग्र परिवर्तन होते. शिक्षण म्हणजे ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि विश्वास प्राप्त करण्याची प्रक्रिया. शिक्षण आपल्याला जगण्याची क्षमता, सामाजिक सहभाग आणि वैयक्तिक विकास साधायला मदत करते. ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार, हे ध्येय उराशी बाळगून प्रवरची सर्व शैक्षणिक संकुल विद्यार्थी केंद्रबिंदू मानून कार्य करत आहेत. नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार शिक्षण समाजाभिमुख करणे, विज्ञाननिष्ठ, बुद्धीप्रमाण्यवादी व प्रामाणिक विद्यार्थी घडवण्यासाठी तसेच शिक्षण अधिक दर्जेदार व्हावे, विद्यार्थी अधिक सक्षम, सजग व समर्थ व्हावेत यासाठी प्रवरेच्या विविध शैक्षणिक संकुलातील व्यवस्थापक व सल्लागार समितीचे सर्व पदाधिकारी, ग्रामस्थ, कार्यकर्ते, अध्यापक, प्राध्यापक, सेवक वृंद सतत प्रयत्न करत आहेत. महाराष्ट्राला शैक्षणिक, सामाजिक आणि औद्योगिक शांत क्रांतीची एक नवी दिशा विखे पाटील परिवारांनी दिलेली आहे.

प्रवरेच्या माध्यमातून कृषी शिक्षण देत असताना सेंद्रिय शेतीवरती भर दिला जात आहे. विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञान देत त्यांना प्रत्यक्ष कामाचाही अनुभव या ठिकाणी मिळत असल्यामुळे येथील विद्यार्थी आज सर्वगुणसंपन्न ठरत आहेत. प्रवरेच्या माध्यमातून चालक, पालक, बालक, शिक्षक आणि विद्यार्थी असे एकत्रित शिक्षण देत असल्यामुळे संस्था ही प्रगतीपथावर राहिली आहे. प्रवरेत शिक्षण घेत असलेला आपला मुलगा हा आमचा पाल्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी घडविणे हाच प्रवरेचा ध्यास आहे.

राज्य शासनाने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेतला, या माध्यमातून प्रशिक्षण आणि रोजगारच्या संधी निर्माण करून दिल्या जाणार आहेत. मुलीकरिता व्यावसायिक शिक्षण मोफत करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेने कौशल्य प्रशिक्षणाकरिता ३७ कोर्सेस सुरू केले असल्याचे युवकांना या माध्यमातून कौशल्यावर आधारित प्रशिक्षण घेता येणार आहे. संस्थेतर्फे प्रशिक्षण भत्ताही देण्यात येत आहे.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था ही ग्रामीण भागात शिक्षण पोहोचवण्याचे महत्त्वाचे कार्य करत आहे. त्यांच्या माध्यमातून प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, तसेच वैद्यकीय, अभियांत्रिकी, फार्मसी, कृषी, व्यवस्थापन यासारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांची शिक्षणसंस्था चालवली जाते. ग्रामीण भागातील मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे, सुरक्षित परिसर आणि आर्थिक सवलती उपलब्ध करून दिल्या जात आहेत. महिलांना शिक्षण मिळावे आणि त्या सशक्त बनाव्यात यासाठी विशेष प्रयत्न केले. केवळ पुस्तकापुरते शिक्षण न देता, खेळ, सांस्कृतिक उपक्रम, विज्ञान प्रदर्शन आदी उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाते. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, सामाजिक आणि मानसिक विकासासाठी उपक्रम आयोजित केले जातात.

नामदारांना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

**-महेश रक्ताटे,** (कार्यकारी संपादक)










